**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ११ /०७/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०३ सोमवार दि. १६ /०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक - १६ /०७/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७ | मा.स्थायी समिती सभा क्र.- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १.शेख नईम युसुफ , २. गायकवाड शिल्पा प्रभाकर , ३. सुलभा प्रकाश पवाळ ,४. अनिता रमेश तोडमल यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी १. मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) २.स्वप्नाली प्रताप इंगावले ३. अर्चना संदिप क्षत्रीय यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री. राहुल शंकर पडोळे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांची दि.१०/०७/२०१८ ते ०९/०७/२०२१ अखेर ३ (तीन) वर्षाकरिता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील ११ महिन्याकरीता दिनांक ०६/०५/२०१८ पासून मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात फिटर व वीजतंत्री या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त कर्मचारी श्री.आफाक शेख , फिटर व श्री.डी.जी.शिंदे, वीजतंत्री यांची मानधनावर केलेल्या नेमणुकीस कार्योत्तार मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १६ | अर्जदार श्री.दयाराम हंसराज राछ,प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांवा रोड,वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.३०७ येथील एकचा मिळकतीवर दोन नळ कनेक्शन ची नोंद झाली असल्याने प्रत्यक्षात एकच नळ कनेक्शन असल्याने रक्कम रूपये ४८४५१/- निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे कामाचे या कामासाठी दर निश्चिती कामी मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८ | केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणे कामी ई - निविदा क्र.१६२३ दि.०८/११/२०१७ मधील प्राप्त दरास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ अंतर्गत विविध ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २० | मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१५९३ अंतर्गत विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेचे ई- निविदा क्र.१२३८ प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी. रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एमएम व्यासाची पाईप गटर करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १६८२ या निविदेच्या निविदा दराच्या वाटाघाटीबाबत प्रभाग क्र. ३१ मध्ये कायनेटीक चौकाजवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| २३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह )उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २४ | ई - निविदा क्र.१६६३ मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ओला कचरा प्रति दिन प्रक्रिया करणेकामी २ मे.टन क्षमतेचे तीन ठिकाणी कंपोस्टींग मशीन बसविणे व तीन वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास व येणा-या खर्चास मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिका तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित पाउलबुध्दे यांची उर्वरीत माहे- जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती रक्कम अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २६ | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत करणेस व त्याकामी पुढील निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट. |
| २७ | महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मा.श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे, तत्कालीन आयुक्त यांचा बदली प्रवास भत्ता बील एकुण रक्कम रूपये ७०,५८०/- अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्रमांक- ७ मा.स्थायी समिती सभा क्र.- ०६शुक्रवार दिनांक २९/१२/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

**२]** विषय क्रमांक- ८ ते २७ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- ७ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र.- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- स्थायी समिती सभा सरू झाली असून अधिकारी उपस्थित नाहीत.मागच्या सभेमध्ये सुध्दा अधिकारी उपस्थित नव्हते त्यांच्यावर काय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली.सभे मध्ये जनतेचे प्रश्न असतात.त्या बाबत अधिकारी गंभीर नाहीत.मागच्या सभेच्या वेळी जे अधिकारी गैरहजर होते त्यांच्या वर काय कारवाई केली याची माहिती दयावी.

प्र.नगरसचिव श्री.तडवी :- मागच्या मिटींगला जे अधिकारी उपस्थित नव्हते त्यांची यादी मागविण्यात आली होती.परंतु सर्व अधिकारी सभेमध्ये उपस्थित झाले होते.सर्व अधिकारी हजर होते.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- इले.विभागाचे ,नगररचनाविभागाचे अधिकारी उपस्थीत नव्हते.

प्र.नगरसचिव श्री.तडवी :- इले.विभागामध्ये अधिकारी राहिले नाहीत.श्री.इथापे साहेब अतिक्रमण मोहिमेमध्ये आहेत.नगररचना विभागाचे श्री.जोशी उपस्थीत होते.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेवरील विषय चालू करा.

विषय क्र.७ चे वाचन करण्यात आले.

मा.बाळासाहेब बोराटे :- इतिवृत्ता बाबत खुलासा करा की,मागील इतिवृत्त मंजूर करण्याचे संपले का सर्व.विषय पत्रिकेव्यवतीरीक्त जे विषय मंजूर झालेले आहेत याची जबाबदारी कोणाची आहे.तसेच मध्ये विषय घातले आहे. जागा देणे बाबत विषय मंजूर करण्यात आले आहेत.हे सर्व विखंडित करणार का?

प्र.नगरसचिव श्री.तडवी :- मा.शासन स्तरावर याची चौकशी चालू आहे. मा.शासन यावर निर्णय घेणार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोणते विषय गेलेले आहेत.

प्र.नगरसचिव श्री.तडवी :- मार्केट विभागाकडील विषय आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- इतिवृत्ता मधिल अनेक ठरावांमध्ये जागा देणे बाबतचे विषय घुसडविण्यात आले आहेत.इतिवृत्ताला मंजूरी कशी देणार.आमचा विरोध नोंदवून घ्या.जागा भाडेतत्वावर दयाची असेल तर ऑफिशीअली दया.आमचा विरोध नाही परंतु विषय अजेंडयावर घ्या.एखादा विषय आम्ही तातडीचा असेल तर आम्ही मान्य करू शकतो.

प्र.नगरसचिव श्री.तडवी :- मा.सभापती व मा.स्थायी समिती सदस्य यांना मी विनंम्रपणे सुचना करतो की, या पुढे विषय पत्रिकीवरील विषय व्यतीरीक्त कोणताही विषय ठरावामध्ये मंजूर करण्यात येवू नये.

मा.श्री.बाळासाहेब :- इतिवृत्तामधील जे विषय विषय पत्रिकेमध्ये आहेत त्यांना मंजूरी देण्यात येईल.त्या विषयांचे इतिवृत्त मंजूर करण्यात येणार नाही.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.
मा.सौ.अनिता राठोड :- इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.
मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ शुक्रवार दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.अनिता राठोड सही /-
ठराव बहुमताने मंजुर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३

विषय क्रमांक- ८ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १.शेख नईम युसुफ , २. गायकवाड शिल्पा प्रभाकर , ३. सुलभा प्रकाश पवाळ ,४. अनिता रमेश तोडमल यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.रक्तपेढी विभाग ३१७ दि.२६/३/२०१८ चा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. रक्तपेढी ३१७ दि. २६/०३/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " रक्तपेढी विभागा करीता करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १) शेख नईम युसुफ २) गायकवाड शिल्पा प्रभाकर ३) सुलभा प्रकाश पवळ ४) अनिता रमेश तोडमल यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. २८/१०/२०१७ ते २७/०४/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि. २८ / ०४ / २०१८ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रं. ५५ दि. २९/१२/२०१७ च्या पुर्व मान्यता पारीतठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३९३० दि. ०७/०२/२०१८ अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात लॅब टेक्निशियन यापदी शेख नईम युसुफ यांची रु. १६,०००/- या दरमहा मानधनावर व तात्पुरत्या स्वस्पात परिचारीका यापदी गायकवाड शिल्पा प्रभाकर, सुलभा प्रकाश पवळ व अनिता रमेश तोडमल यांची रु. ११,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २८/१०/२०१७ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. २८/०४/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी शेख नईम युसुफ यांची रु. १६,०००/- या दरमहा मानधनावर व तात्पुरत्या स्वरुपात परिचारिका यापदी गायकवाड शिल्पा प्रभाकर, सुलभा प्रकाश पवळ व अनिता रमेश तोडमल यांची रु. ११,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त ,आस्थापना विभागा प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखाधिकारी / मुख्यलेखापरिक्षक

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मन्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की,मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक होईल. पृष्ठ क्र.५९ 'अ ' प्रमाणे प्रस्तावित केल्याप्रमाणे उचित निर्णय

अधिनियमातील तरतुदीमध्ये निहीत केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नसावी.मा.उपायुक्त यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवूनच मुख्यलेखापरिक्षक यांचे स्वाक्षरीसाठी सादर करण्याची दक्षता घ्यावी.तसेच आस्थापना प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य राहिल.मागील सेवा कोणत्याही प्रयोजना ग्राहय धरण्यात येणार नाही.या अधीन राहून आस्थापना विभागाने उचित निर्णय घ्यावा.आस्थापना प्रमुख यांचे अभिप्रायासह फेरसादर करावे.

यावर सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे प्रस्तुत शेरांकनानुसार सादर करण्यात येते की,रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत संबंधितांच्या यापुर्वीच्या कार्यालयीन आदेशान्वये कायम सेवाच्या कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत याबाबत अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात येत आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार सदरचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सहाय्यक आयुक्त,आस्थापना व मा.उपायुक्त (सा) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमातील तरतुदी व पृष्ठ क्र.५९ मधील "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.वरील "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.वरील "अ" बाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेवून विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १.शेख नईम युसुफ , २. गायकवाड शिल्पा प्रभाकर , ३. सुलभा प्रकाश पवाळ ,४. अनिता रमेश तोडमल यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे कोठे आहेत.सभेमध्ये का नाहीत.

आस्थापना विभाग श्री.चोरडिया :- कार्यालयीन कामासाठी श्री.लहारे साहेब मुंबईला गेले आहेत.

मा.सभापती साहेब :- कार्यालयीन काम म्हणजे काय काम आहे.

आस्थापना विभाग श्री.चोरडिया :- श्री.झिरपे साहेब ,श्री.दराडे साहेब यांचे कागदपत्रे घेवून गेले आहेत.

मा.सभापती साहेब :- कागदपत्रे घेवून दुसरे कोणी गेले असते.त्यांनी सभेमध्ये उपस्थितीत राहणे आवश्यक होते.

मा.सभापती साहेब :- आज सभा असतांना ते कसे काय गेले अतिरिक्त आयुक्त साहेब तुम्ही सांगा

मा.अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- माझ्याकडे काहीच लेखी व तोंडी माहिती नाही.आस्थापना व सामान्य विभागाचे अधिकारी मा.जिल्हाधिका-यांना सांगतात.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- अजेंडयावरचे विषय महत्वाचे आहे.मग त्यांनी जायला नाही पाहीजे.त्यांनी जबाबदारी देवून जायला पाहिजे होती.

मा.सभापती साहेब :- अजेंडयावर विषय पत्रिका पाहिली असता आठ विषय हे आस्थापना विभागाच्या निगडीत आहेत. या विषयांची माहिती तुम्हाला आहे का?

आस्थापना विभाग श्री.चोरडिया :- प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे नसतील तर विषय घेवू नका.

मा.सभापती साहेब :- मा.जिल्हाधिका-यांनी सांगीतले आहे की,ज्यांची विभागीय चौकशी चालू आहे.त्यांची चौकशी पुर्ण करून त्यांना काय होईल ती किरकोळ शिक्षा देवून त्यासाठी सादरकर्ता,व चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करून त्यांचे आठ दिवसांमध्ये पदोन्नतीचे विषय मार्गी लावणे बाबत आदेश दिले होते.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- सात ते आठ वेळा निवडसमितीच्या बैठका झाल्या.त्या प्रकरणामध्ये गोपनीय अहवाल,मत्ता दायीत्व नव्हते.वास्तवीक पुर्तता करून घेणे हे आस्थापना विभागाचे काम आहे.कोणाकोणाची चौकशी चालू आहे या बाबची माहिती आस्थापना विभागालाच नाही.

मा.सभापती साहेब :- तुमच्या अधिका-या अधिका-यांमध्ये काही वाद असतील त्यामुळे पदोन्नती होत नसेल.कर्मचा-यांचेच काम करीत नाहीत तर नागरीकांचे कामे केव्हा करणार.इंजिनियरांची पदोन्नतीचे काय झाले त्या बाबत तुम्ही आदेशीत करा.काम झाले पाहिजे.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- दि.२०/०७/२०१८ रोजी तारीख ठेवली आहे.चौकशीचे प्रकरण किती आहेत हे आस्थापना विभागास माहिती नाही.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये आस्थापना विभागाचे श्री.लहारे उपस्थिती नाही.येथून पुढे असे चालणार नाही.सभेमध्ये विषय असतांना निघून जायचे.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- श्री.लहारे हे कार्यालयीन कामकाजासाठी मुंबई येथे गेले आहेत.त्यांनी उपायुक्त (सा) यांची रितसर परवानगी घेतलेली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यांना तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १.शेख नईम युसुफ , २. गायकवाड शिल्पा प्रभाकर , ३. सुलभा प्रकाश पवाळ ,४. अनिता रमेश तोडमल यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत च्या ऑफिस रिपोर्टास

सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग आत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी १.शेख नईम युसुफ , २. गायकवाड शिल्पा प्रभाकर , ३. सुलभा प्रकाश पवाळ ,४. अनिता रमेश तोडमल यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत च्या ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बाराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३

विषय क्रमांक- ९ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी १.मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड)२.स्वप्नाली प्रताप इंगावले ३. अर्चना संदिप क्षत्रीय यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.४३,दि. १३/४/२०१८चा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. ४३ दि. १३/४/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) २) स्वप्नाली प्रताप इंगावले ३) अर्चना संदिप क्षत्रीय यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०६/११/२०१७ ते ०५/०५/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि. ०६ / ०५ / २०१८ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. ०८/०५/२०१८ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ५१ दि. २९/१२/२०१७ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ५९ दि. ०४/०४/२०१८ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारिका यापदी मा. स्थायी समिती ठराव क्रं. ६८ दि. ०६/०२/२०१८ च्या पारीत ठरावाच्या दिनांकापासुन मानधनामध्ये वाढ करुन १) मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रु. ८,०००/- व २) स्वप्नाली प्रताप इंगावले , ३) अर्चना संदिप क्षत्रीय यांची रु. १०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०६/११/२०१७ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. ०६/०५/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची दरमहा रु. ८,०००/- व २) स्वप्नाली प्रताप इंगावले, ३) अर्चना संदिप क्षत्रीय यांची रु. १०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. ०९ / ०५ / २०१८ पासुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाअधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त ,आस्थापना विभागा प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखाधिकारी / मुख्यलेखापरिक्षक

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मन्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की,"अ"नुसार कार्यवाही करणेस हरकत नसावी.उपायुक्त यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवूनच मुख्यलेखापरिक्षक यांचे स्वाक्षरी सादर करण्याची दक्षता घ्यावी.तसेच आस्थापना प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य राहिल.मागील सेवा कोणत्याही प्रयोजना ग्राहय धरण्यात येणार नाही.या अधीन राहून आस्थापना विभागाने उचित निर्णय घ्यावा.आस्थापनाप्रमुख यांचे अभिप्रायासह फेरसादर करावे.

यावर सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे प्रस्तुत शेरांकनानुसार सादर करण्यात येते की,रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन व परिचारीका यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत संबंधितांच्या यापुर्वीच्या कार्यालयीन आदेशान्वये कायम सेवाच्या कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत याबाबत अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात येत आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार सदरचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सहाय्यक आयुक्त,आस्थापना व मा.उपायुक्त (सा) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमातील तरतुदी व पृष्ठ क्र.५१ मधील "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही. मा.स्थायी समितीची मान्यता घेवून विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी १. मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) २.स्वप्नाली प्रताप इंगावले ३. अर्चना संदिप क्षत्रीय यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची दरमहा रु. ८,०००/- व २) स्वप्नाली प्रताप इंगावले, ३) अर्चना संदिप क्षत्रीय यांची रु. १०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. ०९ / ०५ / २०१८ पासुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १०                                                                                    सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र.३६ दि.२१/०४/२०१८ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्तसंदर्भिय विषयान्वये की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. ३६ दिनांक २१/०४/२०१८अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये जा.क्र.आस्था. /करारबध्द नेमणुक ३८६८दिनांक ०२/०२/२०१८अन्वये श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुमात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन दिनांक०९/११/२०१७पासुन अटी व शर्तीप्रमाणे सहामहिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. ११/०५/२०१८पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत." सुचित केलेले आहे.

तरी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांची मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ५९ दिनांक २९ / १२ / २०१७ अन्वये पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३८६८ दि. ०२ / ०२ / २०१८ अन्वये दिनांक ०९/११/२०१७ पासुन सहा महिन्या करीता पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचा कालावधी दिनांक ०९ / ०५ / २०१८ रोजी पासुन समाप्त होणार असुन जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ३६ दिनांक २१/०४/२०१८ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दि. १२/०५/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी मिळणे करीता निर्णयासाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) चे कलम ५३ नुसार प्रस्तावित "अ" प्रमाणे विभागाने कार्यवाही करणे आवश्यक ठरते.पृ.क्र.T-४६ वरील मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.०९/११/२०१७ अभिप्राया अवलोकन करून विभागाने मा.स्थायी समिती मंजूरी बाबत उचित निर्णय घेणे योग्य राहिल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- माझ्या वॉर्ड मध्ये श्री.काटकर नांवाचा वायरमन दिलेला आहे.तो या मध्ये आहे का.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- हो आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :-या वायरमनला पुर्ननियुक्ती देण्यात येवू नये.तो सांगतो मला हे काम येत नाही.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- आपल्या प्रभागातील वायरमन बाबत चर्चा झाली होती.त्या ठिकाणी पुर्वी अपघात झालेला जो सय्यद वायरमन आहे.त्याला तेथे पाठविले आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- माझ्या वॉर्ड चे जाउदया इतर ठिकाणी सुध्दा तो काम करणार नाही.महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे.त्याला कुठेच नियुक्ती देवू नये व महानगरपालिकेचा पगार वाया घालू नये.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- पगार वाया जाणार नाही.त्याच्या कडून काम तर आपण करूनच घेणार आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- माझ्या वॉर्ड मध्ये दिड महिन्यापासून त्याने काहीच काम केले नाही.श्री.क्षेत्रेना विचारा ते तर फोन सुध्दा उचलत नाहीत.मेसेज पाठविल्यावर फोन उचलतात.त्यांच्या कडे मोबाईल असून सुध्दा फोन उचलत नाहीत.

मा.सौ.उषा नलवडे :- प्रभाग क्रमांक ७ मध्ये सुध्दा हिच बोंबाबोंब आहे.वायरमन तर नाहीत.मला महानगरपालिकेने बल्फ व चोक दिले आहेत ते तुम्हाला देत आहे.नागरीकांना आम्हाला तोंड दयावे लागते.

मा.सभापती साहेब :- इथापे साहेब विद्युत विभागाचे श्री.क्षेत्रे व शेंडगे हे काम करीता नाहीत.त्यांच्या च्या बाबत सर्वाच्यात तक्रारी आहेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :-फोन उचलत नाहीत.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- त्यांना सक्त लेखी सुचना देण्यात येतील.

मा.सौ.उषा नलवडे :- नविन कव्हर मध्ये घालून जुने गेलेले बल्फ दिलेले आहेत.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- स्टोअर विभागाकडून मटेरियल आलेले आहे.स्टोअर विभगाशी संपर्क करून चेक करून रिप्ले्स करू.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- नविन असुन सुध्दा का बरे असे कशामुळे झाले.

स्टोअर विभागा श्री.जाधव :- आपल्याकडे जे मटेरियल प्राप्त झाले आहे.सर्व नविन प्रकारचे,विद्युत विभागा सप्लाय केले आहे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- या मटेरियल चे बील आपण दिले असेलच ना.

स्टोअर विभागा श्री.जाधव :- नाही बील नंतर होते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा.सभापती साहेब ,आम्ही वेळोवेळी सुचना केली आहे की,यावर नंबरींग करा

स्टोअर विभागा श्री.जाधव :- नंबरीग केले आहे साहेब.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नंबरींगची सुचना मीच मांडली होती,पुर्वी नंबरींक केले जात होते.मध्यंतरीच्या काळात बंद झाले होते.नंबरींग असल्यावर चो-या मा-या कमी होतात.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- त्यांनी त्यांच्या कामा मध्ये चार ते पाच दिवसांमध्ये सुधारणा केली नाही तर आपण त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करू.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पुर्वी क्षेत्रे काम करीत होते.त्यांना एकदा ताकीद दया.

इले.विभागा प्रमुख श्री.इथापे :- इले विभाग पुर्ण पणे विस्कळीत झालेला आहे.मी अतिक्रमण मोहीमे कडे आहे.तरीही एक कार्यालयीन कर्मचारी काम करीत नव्हता त्याची एक महिन्यापासूनची बिनपगारी करणे बाबत रिपोर्ट ठेवलेला आहे.मी सर्व वायरमन,बीगारी,मदतनीस यांची बैठक घेवून कामकाजाचे गांर्भीर्य व त्याचे होणारे परिणाम त्यांना समजावून सांगीतले आहे.आपल्या डोळयासमोर हे उदाहरण आहे.कामा मध्ये सुधारणा करा.आपण जे वेतन घेतो.त्याचा मोबदला देणे हि आपली प्राथमीक जबाबदारी आहे.काम न केल्यास मी कारवाई करणार असे मी बैठक घेवून सर्वाना समज दिलेली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.व मानधन वाढी बाबत दिलेल्या पत्रावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.कामचूकार वायरमन बाबत इले.विभाग प्रमुख यांनी त्यांना कामावरून कमी करणे बाबतचा निर्णय घेवून अहवाल देण्यात यावा.व नव्याने पेपरमध्ये जाहिरात देवून मानधनावरील वायरमन ची भरती करणत यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.नविन वायरमन घेण्यात यावेत.मानधन वाढी बाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.सभापती साहेब :- यामधील जे कामचूकार कर्मचारी असतील त्यांना कामावर घेवू नका.नविन दुसरे चांगले भरा. हे रिस्की काम आहे.यांना प्रशासनाने वेतन वाढ करावी. जेव्हढे वायरमन कमी पडतात तेव्हढे चांगले वायरमन नविन घ्या.काही वायरमन काढणे बाबत तसेच वेतन वाढी बाबत मा.स्थायी समिती सदस्यांनी अर्ज दिले आहेत.त्यांच्या मानधन वाढी बाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना दि. १२/०५/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे ही सभा मान्यता देत आहे.

मा.स्थायी समिती सदस्यांनी सभेमध्ये दिलेल्या पत्रानुसार त्यांच्या मानधनामध्ये वाढ करणे बाबत प्रशासनाने उचित निर्णय घ्यावा. इले.विभाग प्रमुख यांनी कामचूकार वायरमन बाबत त्यांना कामावरून कमी करणे बाबतचा निर्णय घेवून अहवाल देण्यात यावा व नव्याने वर्तमानपत्रा मध्ये जाहिरात देवून मानधनावरील वायरमन भरती करणे बाबतची प्रक्रिया आस्थापना विभागाने करावी.जेणे करून प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांच्या लाईट बाबतीत असलेल्या तक्रारी कमी होतील.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- ११ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ : -** रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र. रक्तपेढी विभाग १० दि.२६/४/२०१८ चा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. रक्तपेढी विभाग १० दि. २६/०४/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " रक्तपेढी विभागा करीता करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडु यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीची कालावधी दि.१५/१२/२०१७ ते १४/६/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि. १५/०६/२०१८ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. १८/०६/२०१८ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत. " सुचित केलेले आहे.

मोरे पल्लवी दगडु यांची सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ४०७४ दि. २०/०२/२०१८ अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी रु.१६,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १५/१२/२०१७ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. १५/०६/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडु यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दि. १८/०६/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १६,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) चे कलम ५३ नुसार प्रस्तावित "अ " प्रमाणे विभागाने कार्यवाही करणे आवश्यक ठरते.मागील सेवा कोणत्याही सेवेसाठी विचारात घेण्यात येणार नाही.या अटीच्या अधिन राहून कामगार विभागाचे अभिप्राय घेवून मा.स्थायी समितीच्या मंजुरी साठी पाठविणे बाबत विभागाने उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीपुढे मान्येतेस्तव ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- विषय क्रमांक ११ ते १३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक ११ ते १३ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ११ ते १३ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडु यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दि. १८/०६/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १६,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडु यांना तीन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन दि. १८/०६/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १६,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १२ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री. राहुल शंकर पडोळे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागा

**संदर्भ : -** बांधकाम विभाग यांचेकडील जा.क्र. १३६ दि. ४/४/२०१८ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये की, बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. १३६ दिनांक ४/४/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन सार्व. बांधकाम विभागाकडेस सद्यस्थितीत दोनच कनिष्ठ अभियंता कार्यरत होते. त्यापैकी नंदकिशोर विठठल जाधव हे दि. ११/१/२०१८ पासुन कामावर हजर नाहीत व श्री. राहुल शंकर पडोळे यांचा मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील ६ महिन्यासाठी पुर्नेनेमणुक करणे बाबत व श्री. जाधव हे गैरहजर असल्याने त्यांचे ऐवजी दुस-या अभिंयंत्यांची नेमणुक करणे बाबत सुचित केलेले आहे.

श्री. नंदकिशोर विठठल जाधव यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती. सद्यस्थितीमध्ये श्री. जाधव हे बांधकाम विभागामध्ये कामावर गैरहजर आहेत.

तसेच सद्यस्थितीमध्ये बांधकाम विभाग यांचेकडील जा. क्र. ११६२ दि. १६/९/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. राहुल शंकर पडोळे यांची मा.स्थायी समिती ठराव क्रं. ५४ दि. २९/१२/२०१७ अन्वयेच्या पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ३८७१ दिनांक ०२/०२/२०१८ अन्वये दिनांक २९/११/२०१७ पासुन सहा महिन्या करीता पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचा कालावधी दिनांक २९/५/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार असुन जा. क्र. बांधकाम विभाग १३६ दिनांक ४/४/२०१८ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) चे कलम ५३ नुसार प्रस्तावित "अ"प्रमाणे विभागाने कार्यवाही करणे आवश्यक ठरते.मागील मनपातील सेवा कोणत्याही सेवेसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही या अटींच्या अधिन राहून कामगार विभागाचे अभिप्राय घेवून मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी विभागाने उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री. राहुल शंकर पडोळे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- विषय क्रमांक ११ ते १३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक ११ ते १३ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ११ ते १३ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १३ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांचीदि.१०/०७/२०१८ते०९/०७/२०२१अखेर ३ (तीन) वर्षाकरिता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट**.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह.

संदर्भ : - १. जा.क्र.आस्थापना १६२७ दिनांक २९/०७/२०१७ ने भुलतज्ञांची पॅनल शिपवर नेमणूक.

२. मा.स्थायी समिती ठराव क्र.७३ दि.०६/०२/२०१८ ने दि.१ एप्रिल २०१८ अखेर मानधन वाढ.

३. कै.बा.दे.दवाखाना जा.क्र.१९१ दि.३१/०५/२०१८

४. मा.स्थायी समिती ठराव क्र.६९ दिनांक ०६/०२/२०१८ अन्वये कै.बा.दे.दवाखाना येथे स्त्रीरोगतज्ञ पॅनल नेमणूक.

विनंती रिपोर्ट की,कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायना ऑपरेशन करीता वधिरिकरण तज्ञांची (भुलतज्ञ) आवश्यकता असते.त्यासाठी कै.बा.दे.दवाखाना येथे शहरातील अनुभवी डॉक्टरांचा प्रती केस मानधनावर पॅनलमध्ये वेळोवेळी नेमणूक करण्यात येते.त्याकरीता जा.क्र.आस्थापना १६२७ दि.२९/०७/२०१७ अन्वये दि.१०/०७/२०१७ ते ०९/०७/२०१८ अखेर भुलतज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती.सदर पॅनलची मुदत ही दि.०९/०७/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.तसेच संदर्भ क्र.२ नुसार पॅनलशीपवर नेमण्यात आलल्या भुलतज्ञ डॉक्टरांना मानधन वाढ करण्यात आलेली आहे.सध्या १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.८००/- ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.१७००/- प्रति केस (Night १० Pm to ६ am) या प्रमाणे मानधन देण्यात येत आहे.हॉस्पिटलमधील प्रसुती रूग्णांच्या आवश्यक उपचाराच्या दृष्टीने पुढील कालावधीकरिता भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणे गरजेचे आहे.त्याकरिता संदर्भ क्र.३ ने भुलतज्ञ डॉक्टरांच्या संघटनेला पत्र देवून इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांचे अर्ज या कार्यालयाकडे मागविण्यात आलेले आहेत.त्या अनुशंगाने १) डॉ.स्नेहलता नितीन सायंबर २) डॉ.सचिनकुमार दशरथ लांडगे ३) डॉ.प्रियंका रूपनवर (लांडगे) ४) डॉ.कृष्णा ग्यानदेव आनारसे ५)डॉ.महादेव रंदाळे ६) डॉ.शशांक प्रभाकर मोहळे ७) डॉ.कृष्णा कलवाणी या भुलतज्ञ डॉक्टरांचे अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत.तरी या कार्यालयाकडे प्राप्त अर्जाप्रमाणे वरील भुलतज्ञांची १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.८००/- ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.१७००/- प्रति केस (Night १० Pm to ६ am) या प्रमाणे दिनांक १०/०७/२०१८ ते ०९/०७/२०२१ अखेर तीन वर्षाच्या कालावधीकरीता पॅनलशिपवर नेमणूक करणेकामी तसेच सदरची नेमणूक ही पॅनलशिपवर असून कुठल्याही प्रकारची स्थायी अथवा अस्थायी एकत्रीत मानधनावर नाही.भुलतज्ञांना अदा करण्यात येणारी रक्कम ही मानधन नसून त्यांनी केलेल्या केसस प्रमाणे फी असणार आहे.तसेच पॅनल नियुक्त केल्यानंतर वेळोवेळी जे नवीन भुलतज्ञ डॉक्टर पॅनलमध्ये काम करणेस इच्छुक असतील अशा भुलतज्ञ डॉक्टरांचा पॅनलमध्ये समावेश करणे व ज्या भुलतज्ञ डॉक्टरांना काम करण्या ाची इच्छा नसल्यास पॅनलमधून वगळाणे इत्यादी बाबतीत प्रशासकीय कार्यवाही या कार्यालयामार्फत करणेत येईल.यापुर्वी संदर्भ क्र.४ ने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता स्त्रीरोगतज्ञ

डॉक्टरांची ऑनकॉल व्हिजीट बेसवर या कार्यालयामार्फत पॅनलची नेमणूक करण्यात आलेली होती.सबब सदरचा पॅनलनेमणूकी बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस सविनय सादर.तसेच पुढील

कालावधीकरिता पॅनलची नेमणूक होई पर्यत दवाखान्याची तातडीची सेवेचा विचार करिता संदर्भ क्र.१ ने नेमण्यात आलेल्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलला सध्याच्या मानधनावर मुदत वाढ देणेस प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्र.वैद्यकीय अधिक्षक कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,   अ   नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्रय की,उपरोक्त   अ   प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांचीदि.१०/०७/२०१८ते०९/०७/२०२१अखेर ३ (तीन) वर्षाकरिता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट **आहे.**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- विषय क्रमांक ११ ते १३ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक ११ ते १३ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :-  विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ११ ते १३ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांचीदि.१०/०७/२०१८ते०९/०७/२०२१अखेर ३ (तीन) वर्षाकरिता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीबाबतच्या प्रस्तााावास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :- :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात १) डॉ.स्नेहलता नितीन सायंबर २) डॉ.सचिनकुमार दशरथ लांडगे ३) डॉ.प्रियंका रूपनवर (लांडगे) ४) डॉ.कृष्णा ग्यानदेव आनारसे ५)डॉ.महादेव रंदाळे ६) डॉ.शशांक प्रभाकर मोहळे ७) डॉ.कृष्णा कलवाणी या भुलतज्ञ डॉक्टरांची १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया  (S.A.) करिता रू.८००/- ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.१७००/- प्रति केस (Night १० Pm to ६ am) या प्रमाणे दि.१०/०७/२०१८ते०९/०७/२०२१अखेर ३ (तीन) वर्षाकरिता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीस तसेच कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल व्हिजीट बेसवर पॅनलची नेमणूक करणेबाबच्या  ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे                    सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे              सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३

विषय क्रमांक- १४ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील ११ महिन्याकरीता दिनांक ०६/०५/२०१८ पासून मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग

अहमदनगर शहर हद्दीतील नगर रचना योजना क्र.१,२,३ व ४ मधील मंजूर आरक्षीत भूखंड,रेखांकनातील खुले/रस्ते तत्कालीन नगरपरिषदेच्या मालकीची जागा/इमारती ,पाणी पुरवठया साठी संपादन केलेल्या जमिनी,खरेदी केलेल्या इत्यादी मालकीच्या जागेस महानगरपालिकेच्या नांवाची नोंदी झाल्या नसल्याचे निदर्शनास आल्याने या कामासाठी माहितीगार व तज्ञ निवृत्त तहसिलदार व सर्व्हेअर यांची नियुक्ती करणेसाठी स्थायी समितीच्या मंजूरीने संयुक्त निविदा मागविण्यात आल्या होत्या,त्या प्रमाणे श्री.एस.बी.शिंदे,निवृत्त तहसिलदार यांची कमी दराची निविदा मंजूर करून ६महिने कालावधी करीता स्थावर मिळकत व्यवस्थापन कामाचा कार्यारंभ आदेश दि.७/१२/२००९ रोजी देणेत आलेला होता.

त्यानंतर स्थायी समितीच्या मंजुरीने त्यांचे कामाची मुदत वाढ वेळोवेळी देणेत आलेली होती.त्या कालावधीत त्यांचे कामा मुळ एकूण १९०४ खुल्या इमारती, इत्यादी व रस्त्याचे १७८६ जागेस नोंदी नसल्याचे आढळून आलेले आहेत.प्रत्येक प्रकरणात खरेदी खत,सूची क्रमांक -२,अकृषीक आदेश,मंजूर रेखांकन,ताबे पावती,पंचनामा ताबे पावती व मागणी प्रमाणे कागदपत्र उपलब्ध करून पाठविलेल्या प्रकरणा पैकी आता पर्यत १३४२ खुल्या व १३६२ रस्त्याच्या अशा एकुण २७०४ जागेस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी ७/१२ व मिळकत पत्रीकेवर केलेल्या आहेत व उर्वरीत काम प्रलंबित आहे.

वरील कालावधीत पिंपळगांव माळवी येथील तलावासाठी संपादन केलेल्या ७०० एकर जमिनीची नोंद नव्हती,त्याचे जुने कामदपत्रांचा शोध घेवून प्रस्ताव सादर केलेला होता.या बाबत मा.जिल्हाधिकारी ,भूमि अभिलेख खात्या कडून उपस्थित केलेल्या मुदयाची व कागदपत्राची पुर्तता करून सातत्याने पाठपुरवा केलेला आहे.७/१२ ला महानगरपालिकेच्या नावांची नोंद करणेस ५ ते ६ वर्षाचा कालावधी लागलेला आहे.

पथकाच्या कामाची मागील मुदत दि.०५/०५/२०१७रोजी संपुष्टात आल्याने सादर प्रस्तावा प्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.-२७दिनांक ०३/०७/१७अन्वये ११ महिन्या करिता मुदत वाढ देणेत आलेली होती त्याप्रमाणे क्र.जा.नं.टी.पी.४३०८दि.३१/०७/१७अन्वये कार्यारंभ आदेश देणेत आलेला होता.त्याची मुदत ०५/०४/२०१८रोजी संपुष्टात येत आहे.त्यांनी केलेल्या व करावयाच्या कामाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**केलेले काम**

१. स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकाने मुदतवाढ दिलेल्या ०५/०६/२०१७ पासुन संबंधित खात्याचे मागणी प्रमाणे मंजूर रेखांकन,जागा ताब्यात घेतल्याचा व संपादना बाबतच्या पंचनामा ताबे पावती,खरेदी खत व सुचि क्र.२ ,अकृषीक आदेश ,७/१२ व मिळकत पत्रीकेच्या व आवश्यक त्या कागदपत्राच्या नकला प्राप्त करून घेवून एकुण -२१९ खुल्या व -२७२ रस्ता जागेचे प्रकरणे पाठविण्यात आलेली होती.त्यापैकी खुल्या -१६९ व १५२ रस्त्याचे जागेस ७/१२ ला व मिळकत पत्रीकेवर महानगरपालिकेच्या नांवाने नोंदी झालेल्या आहेत.व खात्याकडे प्रलंबित प्रकरणात खात्या कडून उपस्थित केलेल्या मुद्याची पुर्तता करून प्रकरणे त्यांचे कडे पाठविलेली आहेत.प्रलंबित प्रकरणात संबंधित खात्याकडे वेळोवेळी स्मरणपत्र दिलेली आहेत.

२. मुदव वाढचे कालावधीत नगर रचना विभाग,बांधकाम ,तिक्रमण,पाणी पुरवठा या विभागाकडून प्राप्त झ ाालेल्या प्रकरणात तसेच मा.महापौर,पा महापौर व विविध समीत्यावरील सदस्य,नगरसेवकांच्या मागणी प्रमाणे -५१ एकूण प्रकरणात पथकातील सर्व्हेअर यांनी मोजणी करून संबंधितास अहवाल व माहिती दिलेली आहे.

पिंपळगांव माळवी येथील तलावासाठी संपादन केलेल्या ७०० एकर जमिनीचा महानगरपालिकेच्या नांवाची नोंद ७/१२ ला झालेली आहे.या संपादीत क्षेत्राची जागेची मोजणीचे वेळी उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचे खात्या कडील सर्व्हअर यांना तलावातील सर्व्हे पैकी एकुण ८३४ पोट हिस्सा जमिनीच्या हद्दी खुणा दाखवून दिलेल्या आहेत.त्याच प्रमाणे निश्चित केलेल्या हद्दी नगर रचना ,पाणी पुरवठा व बांधकाम विभागास पथकातील सर्व्हेअर यांनी मदत केलेली आहे.

३. पिंपळगांव माळवी तलाव संपादन नदी,ओढे,गांवठाण,मार्ग इत्यादीचे १०० एकर क्षेत्र आलेले आहे.सदरचे क्षेत्र नियमाप्रमाणे महानगरपालिकेकडे वर्ग करणे बाबत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडे अहवाल सादर केलेला आहे.व तयामध्ये स्मरणपत्रे दिलेली आहे.

४. नगर रचना योजना क्र.४ मधील अंतिम भूखंड क्रमांक १९३,१९५ बाबत वक्फ न्यायधिकरण व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे हाजी हमीद तकीया ट्रस्ट,अहमदनगर यांनी दाखल केलेल्या दाव्यात तसेच जिल्हा न्यायालयात अहमदनगर यांचे कोर्टात सि.स.नं.७३९७ मिळकतीचे खरेदी खता बाबत महानगरपलिकेने दाखल केलेल्या दाव्यात तसेच पिंपळगांव माळवी येथील गट नंबर २७३ मधील मिळकती बाबत श्री.बाबासाहेब शिंदे यांनी दाखल केलेले दावा क्रमांक ७३६/२०१३ मध्ये महानगरपालिका पॅनल वरील संबंधित ॲडव्होकेट यांचे मार्फत परिच्छेद निहाय अहवाल व प्रतिज्ञापत्र करून  दिलेले आहे.या कामात पथकातील निवृत्त अधिकारी व सर्व्हेअर यांनी मदत केलेली आहे.

५. अहमदनगर शहराची दुसरी सुधारीत योजनेतील आरक्षीत प्रयोजना साठी केडगांव येथील सर्व्हे नंबर ४२१-अ व ४९९ सरकारी जागा,सि.स.नं.६६४-अ /१,६०१५ - अ/१ अ भिंगार सर्व्हे नं३५३ व वसंत टॉकीज मधील या सरकारी जागा इकडेस हस्तांतरीत करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेले आहेत.त्या बाबत मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालया कडून उपस्थित केलेल्या मुदयाप्रमाणे कार्यवाही करून त्याबाबत स्मरण पत्रे दिलेली आहेत.

**प्रलंबीत करावयाचे कामे -**

१. एकुण -३८९ खुल्या व ३४७ रस्ते एकूण ७३६ प्रकरणे नोंदी साठी प्रलंबित आहेत.त्या प्रकरणात संबंधित खात्याच्या मागणी प्रमाणे मंजूर रेंखांकन,अकृषीक आदेश,जागा ताब्यात घेतल्याचा व संपादना बाबतचा पंचनामा ताबे पावती,खरेदी खत व सुची क्रमांक -२ इत्यादी कागदपत्र उपलब्ध करून घेवून प्रकरणे संबंधित खात्या कडे पाठवावी लागणार आहेत.

२. आता पर्यत १३४२ खुल्या व १३६२ रस्ते असे एकुण २७०४ या मिळकतीच्या महानगरपालिकेच्या नांवाने नोंदी झालेल्या ७/१२ व मिळकत पत्रीकेच्या उतारे काढून घ्यावे लागणार आहेत व त्यावरील क्षेत्राचा ताळमेळ घेवून त्यात तफावत आढळून आलेल्या प्रकरणात दुरूस्ती करून अथवा खुलासा करून प्रकरणे पुन्हा संबंधित खात्याकडे पाठवावी लागणार आहेत.परंतु नक्कला काढणे साठी निधी उपलब्ध न झाल्याने हे काम पुर्ण झालेले नाही.

३. महानगरपालिकेच्या नांवाने नोंदी झालेल्या आता पर्यत -३४६ खुल्या जागेच्या मोजणी केलेल्या आहेत.उर्वरीत खुल्या जागेच्या मोजणी करून क्षेत्राची खात्री करून घ्यावी लागणार आहे.व त्यात काही तफावत आढळून आल्यास दुरूस्ती बाबतची पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

४. सि.स.नं.४७७०-अ मधील ९ ए.११ गुंठे क्षेत्रास महानगरपालिकेच्या नांवाची नोंद मिळकत पत्रीकेवर करणे बाबत नगर भूमापन अधिकारी यांनी निर्णय दिलेला होता.त्यावर अहमदनगर एज्युकेशन सोसायटी यांनी जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचे कडेस दाखल केलेल्या अपीलाचा निर्णय पालीके विरूध्द दिलेला आहे.त्याबाबत मा.उप संचालक भूमि अभिलेख,नाशिक प्रदेश नाशिक यांचे कडेस अपील करणे आवश्यक आहे.

५. सि.स.नं.६४० व नालेगांव येथील सर्व्हे नंबर २४६ त्याचा सि.स.नं.६८६७ या मिळकती बाबतचे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर येथे अपील करावे लागणार आहेत.

६. उप संचालक भूमि अभिलेख ,नाशिक प्रदेश नाशिक यांचे कडेस न.र.क्रमांक -४ मधील अं.भू.क्रमांक -१११ मध्ये पालिकेने दाखल केलेल्या अपीलातील कामकाज करावे लागणार आहे.

७. पिंपळगांव माळवी येथील आदिवासी भिल्ल समाजाच्या इसमांनी तलावातील जमिनीची मागणी केलेली आहे.त्याअनुषंगाने अनूसुचित जनजाती आयोग,दिल्ली ,शासन व जिल्हाधिकारी यांचे कडील आदेशाप्रमाणे या प्रकरणात पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

८. पिंपळगांव माळवी तलावासाठी नदी,ओढे ,गांवठाण रस्ते हे संपादाना खाली आलेले १०० ए.जमिनीचे क्षेत्र महानगरपालिके कडे हस्तांतरीत करण्याच्या प्रकरणात मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

मिळकतीस नोंदी करणेचे काम संपुर्णतः दुस-या खात्यावर अवलंबुन असल्याने व सद्यस्थितीत नोंदीचे कामकाज संगणक प्रणालीतुन केली जात असल्याने मागणी केलेले कागदपत्र वेळेवर उपलब्ध होत नसल्याने काही प्रकरणांत कार्यवाहीस विलंब लागतो हि जरी वस्तुस्थीती असली तरी देखील जागेचे बेकायदेशीर हस्तांतर होवू नये व पालिकेच्या विकास कामा साठी प्रत्येक मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाची नोंद होणे आवश्यक आहे.मुदत वाढीचे कालावधीत पिंपळगांव माळवी तलावाचे मोजणीचे कामा मुळे नोंदी साठी प्रकरणे पाठविता आलेली नाहीत.

मुदतवाढ कालावधीत पथकातील अधिकारी व कर्मचारी त्यांनी नियमती पणे समाधानकारक व चांगल्या प्रकारे काम केलेले आहे.परिणामी पालिकेचे पिंपळगांव माळवी येथील तलावाचे संपादन केलेल्या ७०० एकर क्षेत्राची व शहरातील १३४२ खुल्या व १३६२ रस्त्याच्या क्षेत्रास महानगरपालिकेच्या नांवाच्या ७/१२ ला व मिळकत पत्रीकेवर नोंदी झालेल्या आहेत.जागा विकसीत करणेस तसेच बेकायदेशीर हस्तांतर केलेस संबंधिता विरूध्द मालकी हक्कामुळे पालिकेस तांत्रीक अडचण निर्माण होणार नाही तसेच पालिकेच्या एकुण मिळकती ,त्यावरील क्षेत्र,ठिकाण,इत्यादी माहिती अदयावत झालेली असल्याने त्या बाबत भविष्यात अडचण निर्माण होणार नाही.

पालिकेच्या मिळकती बाबतच्या कामाची पुर्णत:त्यांना माहिती झाली असल्याने प्रलंबीत कामे एकसुत्री व बिनचुक होण्याच्या तसेच पालिकेच्याजागेच्या संबंधात,नागरीकांचे तक्रारी बाबत व कार्यालयीन प्रकरणी कामात अतिक्रमणे,पाणी पुरवठा,बांधकाम विभाग यांचे कडील काही प्रकरणात मोजणी करून घेणे आवश्यक असते.त्या कामासाठी कार्यरत पथकाचे सेवेची आवश्यकता आहे.पुढील कालावधी मंजूर दराने ते काम करणेस तयार आहेत.

स्थावर मिळकत व्यवस्थापनाचे कामासाठी पालिकेत स्वतंत्र्य कर्मचारी यांची नियुक्ती केलेली नाही त्यामुळे पथकातील निवृत्त अधिकारी /कर्मचारी मंजूर यांचे वरील झालेला खर्च दुबार नसून पालिकेच्या मौल्यवान स्थावर मिळकत सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने हितावह झालेला आहे.काही वेळेस पुढील कालावधीची मुदतवाढ देताना स्थायी समितीचे मंजूरी साठी विलंब लागलेला आहे.कामाची सलगता असावी यादृष्टीने व्यपगत कालावधीत त्यांनी केलेल्या कामची मानधन दिलेले नाही.

पथकास मुदतवाढ देणेची बाब ही शासकीय सेवेतील मुदतवाढ अथवा पुर्ननियुक्ती या सदरात मोडत नाही.त्यांचे कडे असलेले विशिष्ट काम विचारात घेवून मंजूर निविदे प्रमाणे नियुक्ती दिलेली आहे.तरी प्रस्तावातील वस्तुस्थिती विचारात घेवून श्री.शिंदे व त्यांच्या पथकाच्या कामाची ०६/०५/२०१८ पासून ११ महिन्याचे मुदत वाढ देणे व मंजूर निवेदनातील सरासरी प्रमाणे दर महा रू.४९३३०/- प्रमाणे ११ महिन्या करीता रूपये ५,४२,६३०/- खर्चाचे मंजूरीचा प्रस्ताव स्थायी समिती कडे सादर करण्यास आवश्यक आहे.

येणे प्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की,महानगरपालिकेची कामाची निकड व आर्थिक हीत लक्षात घेता व केलेल्या आणि प्रलंबीत कामाचा आढावा पाहाता मा.सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस्तव हरकत नाही. मुळ नियुक्ती आदेशाची नस्तीत ठेवावे.सदरची ११ महिन्याची मुदत वाढी देणे बाबत विभागाने खात्री करावी.पुर्तता सह फेर सादर करावे.

यावर सहाय्यक संचालक नगर रचना यांचा अभिप्राय की,मागणी प्रमाणे मुळ नस्ती सोबत सादर करीत आहे.त्यांच्या कामात सलगता व एकसुत्रीपणा रहावा म्हणून ११ महिने कामाची मुदतवाढ यापुर्वीही दिलेली आहे.याची खात्री केलेली आहे.अदयाप कामे शिल्लक असलेने पुन्हा ११ महिने मुदतवाढ देणे आवश्यक आहे.सदरचे काम मनपा मालकीच्या मिळकतीच्या नोंदी अदयावत करणेबाबत अत्यंत महत्वाचे काम असल्याने प्रस्तावा प्रमाणे मुदत वाढ देणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की,मा.सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचे शिफारसीप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजूरीसाठभ पाठविणे उचित राहील. मागील अ प्रमाणे उचित निर्णय घेणे योग्य राहिल.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- या पथकाने चांगले काम केले आहे.त्यांनी महानगरपालिकेच्या जागेला नांव लावण्याचे काम केले आहे. महानगरपालिकेची जागा होती.पिंपळगांव माळवीच्या जागेवर सुध्दा यांनी नांव लावले आहे.महानगरपालिकेचे ३८ वर्ष झाले आपले नांव नव्हते,तेथे आपले झोन कार्यालय आहे.एवढ काम करून त्यांना चकारा कशाला मारायला लावता.लगेच त्यांचा विषय घेत जा.लहारे साहेबांना सांगून ताबडतोब विषय घेत जा.जे खरे काम करतात,त्यांना काय अडचण होती.उलट त्यांचा अभिनंदनाचा ठराव करायला पाहिजे.चांगले काम करतात म्हणून.

मा.सभापती साहेब :- चांगले काम करतात.सावेडी येथे रासने नगर मध्ये सव्वालाख स्वेअर फुट जागा आहे.त्याच्यावर आले नांव लागत नाही.क्लीअर कट जागा असतांना आपण तेथे वेळोवेळी कमी पडतो.परत वसंत टॉकीज येथे सुध्दा आपली जागा आहे.त्या ठिकाणी सुध्दा आपले नांव लागत नाही.बाकीचे झाले .आणखी चार जागेस नांव लावण्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावा.काही अडचणी असेल तर आम्हाला सांगा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपल्या जुन्या महानगरपालिकेला सरकारी म्हणून नोंद झाली आहे.आपली नउ एकर जागा आहे.माहिती सुविधा केंद्र,गॅरेज,फायर ब्रिगेड,त्रिदल बिल्डींग,विश्राम बाग क्लब या सर्व जागेवर सरकारी म्हणून नोंद झाली आहे.जोशी साहेब या बाबत माहिती सांगा.सभागृहाला थोडी माहिती दया.कलेक्टर साहेबांकडे सुध्दा हा विषय झाला आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्या चार जागा आहेत.तेथे नांव लागणे बाकी आहे.त्या मोक्याच्या जागा आणि महानगरपालिकेच्या कमीत कमी पाचशे ते सातशे कोटींच्या मालकीच्या किंवा त्यापेक्षाही जास्त किंमतीच्या जागा आहेत.त्यामुळे हा विषय गांर्भीयाने घेण्याची गरज आहे.आपले सर्व क्लिअर असतांना आपल्या विरोधात निकाल लागतात.आपली बाजू भक्कम असतांना,आपले नांव असतांना आपले नांव कट होवून दुसरे नांव लागते.या मध्ये जास्त लक्ष देवून आपले नांव लवकरात लवकर लावण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नगरचरना विभागाकडील पथकाची मुदत ०५/०४/२०१८रोजी संपुष्टात येत आहे.मुदत समाप्ती नंतर पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभागाकडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकाची मुदत ०५/०४/२०१८रोजी संपुष्टात येत आहे.मुदत समाप्ती नंतर पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- या पथकास मनपाच्या मिळकतीची संपुर्ण माहिती झालेली आहे.राहिलेल्या मिळकतीची नांव लावणे व अन्य कामासाठी कार्यरत पथकाचे सेवेची आवश्यकता आहे. प्रस्तावातील वस्तुस्थिती विचारात घेवून श्री.शिंदे व त्यांच्या पथकास मुदत समाप्ती नंतर पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्ट नुसार अ.नगर महानगरपालिकेच्या अ.नगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभागाकडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकाची मुदत ०५/०४/२०१८रोजी संपुष्टात येत आहे.मुदत समाप्ती नंतर पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास हि सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

अनुमोदक :- मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १५ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात फिटर व वीजतंत्री या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त कर्मचारी श्री.आफाक शेख , फिटर व श्री.डी.जी.शिंदे, वीजतंत्री यांची मानधनावर केलेल्या नेमणुकीस कार्योत्तार मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

**संदर्भ : -** १. जा.क्र.आस्था/ १०२४५ दि.२९/०५/२०१८ अन्वये पत्र.

२. शेख आफाक शेख अजीज,सेवानिवृत्त फिटर पाणी पुरवठा विभाग

३. श्री.शिंदे डि.जी.,सेवानिवृत्त वीजतंत्री पाणी पुरवठा विभाग यांचा दि.३०/०५/२०१८ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थापनांतर्गत वरील नमुद २ व ३ कर्मचारी नुकतेच महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले आहेत.या निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे संदर्भीय अर्ज इकडेस प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मानधनावर काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की,शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.कारण वितरण व्यवस्थेचे काकाचे स्वरूप विचारात घेता त्याकरीता असलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे.त्यामुळे नागरीकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारींचा वेळेत निपटारा होत नाही.

यातच मागील ६ महिन्यांपासून दि.३०/०५/२०१८ अखेर या विभागाकडील कामाचा अनुभव असलेले कर्मचारी मोठया संखेने तांत्रिक कर्मचारी वर्ग सेवानिवृत्त झालेली आहे.परिणामी कर्मचा-या अभावी दैनंदिन पाणी वितरण व्यवस्थेची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी महानगरपालिकेकडून पाणी परवठा विभागा करीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यत पाणी पुरवठा विभागा कडील कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले वरील नमुद कर्मचारी हे पुढील प्रमाणे काम पहात होते.व सदर कामाचा त्यांना उत्तम अनुभव आहे.

१. शेख आफाक शेख अजीज,फिटर - दैनंदिन देखभाल दुरूस्तीचे कामे व शहरातील दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे.

२. श्री.शिंदे डि.जी.वीजतंत्री - पाणी पुरवठा केंद्र वसंत टेकडी येथील कार्यरत मोटारींची दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची कामे

याच अनुषंगाने आस्थापना विभागाने इकडेस पाठविलेले संदर्भ क्र.१पत्रामध्ये मा.उपमहापौर श्री.अनिल वसंतराव बोरूडे व मा.सभागृह नेता श्री.उमेश (गणेश)खंडेराव कवडे यांनी दि.१५/०५/२०१८ रोजी मा.आयुक्त यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये श्री.आफाक शेख,फिटर हे दि.३१/०५/२०१८पासून मनपा सेवेतून सेवानिवृत्त होत आहे.श्री.आफाक शेख यांना पाणी वितरण व्यवस्थापन व दैनंदिन देखभाल दुरूस्ती कामाचा चांगला अनुभव असल्याने व अशा कर्मचा-याची महापालिकेस आवश्यकता असल्योन श्री.शेख यांना फिटर या पदावर मानधनावर नेमणूक करावी अशी केलेली मागणी अनुषंगाने आस्थापना विभागाने श्री.शेख आफाक यांचे मानधनावर नियुक्ती बाबत पाणी पुरवठा विभागामार्फतच उचीत कार्यवाही करावी असे निर्देशीत केलेले आहे.

आस्थापना विभागाचे दि.२९/०५/२०१८ चे निर्देशानुसार या विभागा करीता लागणारे कर्मचारी मानधावर घेणे बाबतची कार्यवाही पाणी पुरवठा विभागा कडून होणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

यास्तव महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार पाणी पुरवठा विभाग करीता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीत,फिटर व श्री.शिंदे डि.जी.वीजतंत्री यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्परूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दर महा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील.तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवाला मधिल अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात फिटर व वीजतंत्री या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त कर्मचारी श्री.आफाक शेख , फिटर व श्री.डी.जी.शिंदे, वीजतंत्री यांची मानधनावर केलेल्या नेमणुकीस कार्योत्तार मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.विजय गव्हाळे :- स्टेशन रोड भागाती माझ्या भागामध्ये वॉलमन नसलयाने माझ्या प्रभागामध्ये वॉलमन देण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- किती कर्मचा-यांचे मानधनावर घेणे बाबत आर्ज प्राप्त झाले आहेत.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- महानगरपालिकेचे तांत्रिक स्परूपाचे कामे करणारे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.पाणी पुरवठा विभाग करीता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीत,फिटर व श्री.शिंदे डि.जी.वीजतंत्री यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्परूपात मानधनावर नियुक्ती देणे बाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता.या खेरीज श्री.संतराम पाचारणे यांचा अर्ज आला आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- श्री.पाचारणे हे सुध्दा जुने वॉलमन आहेत.त्यांना कामाची सर्व माहिती आहे.त्यांना मानधनावर घेण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- श्री.पाचारणे यांचा प्रस्ताव तयार करून पुढील मा.स्थायी समिती च्या मंजूरी करीता ठेवण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.,

मा.सभापती साहेब :- अ.नगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील ५३च्या तरतुदी नुसार पाणी पुरवठा विभाग करीता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीत,फिटर व श्री.शिंदे डि.जी.वीजतंत्री यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्परूपात मानधनावर सहामहिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे नेमणूकीस कार्योत्तर मंजूरीच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार पाणी पुरवठा विभाग करीता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीत,फिटर व श्री.शिंदे डि.जी.वीजतंत्री यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्परूपात मानधनावर सहा महिने कालावधीसाठी दर महा मानधन किमान रूपये १२०००/- प्रमाणे नेमणूकीस कार्योत्तर मंजूरीच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १६ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.दयाराम हंसराज राछ,प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांवा रोड,वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.३०७ येथील एकचा मिळकतीवर दोन नळ कनेक्शन ची नोंद झाली असल्याने प्रत्यक्षात एकच नळ कनेक्शन असल्याने रक्कम रूपये ४८४५१/- निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव रोड

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,श्री.दयाराम हंसराज राछ वॉर्ड नं.२१ बिल नं.३०७ यांनी दि.२३/४/१९९८ व दि.७/१०/२०१६ रोजी अर्ज देवून माझे बिल नं.३०७ मध्ये पण पाणीपट्टी रू.१५००/- येत आहे.ती मी रेग्युलर भरलेली आहे.व बिल नं Z४२२१००००२८३ ने पण पाणीपट्टी येत आहे.तरी बिल नं Z४२२१००००२८३ ची नोटीस फी व शास्तीसह पाणीपट्टी रू.४८४५१/- कमी करून मिळावी असे इकडेस अर्ज देवून कळविले आहे.

वरील आलेला अर्ज मनपा फिटर यांनी दि.२७/१०/२०१६ रोजी समक्ष स्थळपहाणी करून सदर मिळकतीवर एकच नळ कनेक्शन असले बाबत लेखी अहवाल सादर केलेला आहे.

तरी श्री.दयाराम हंसराज राछ वॉर्ड नं.२१ बिल नं.३०७ यांच्या दि.२३/०४/२०९८ च्या अर्जानुसार तत्कालीन लिपीक यांनी वरील मालमत्ता धारक यांची पाणीपट्टी कमी करून दिली नाही.तरी सन २००१-२००२ पासुन सन २०१६-१७ पर्यत शास्ती व नोटीस फी सह पाणीपट्टी ची थकबाकी रू.४८४५१/- इतकी रक्कम वसुल न होणारी असुन मुंबई प्रंतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ प्रमाणे निर्लेखीत करणे आवश्यक आहे.सदरचा प्रस्ताव मंजूरी करीता आदेशार्थ सादर

येणे प्रमाणे वसुली लिपीव व कर निरिक्षक यांचा अहवाल असे.

यावर रिव्हिजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,वॉर्ड नं.२१ चे वसुली लिपीक यांनी व कर निरीक्षक यांनी सादर केलेला प्रस्ताव तसेच दिनांक २७/१०/२०१६ रोजी पाणी पुरवठा विभागातील फिटर व शाखा अभियंता यांनी समक्ष पहाणी केलेला अहवाल सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आलेले नसल्याने अधिनियमातील १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखीत करण्यास हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मालमत्ता धारक यांचे दि.२३/०४/१९९८ चे १ व ४ कनेक्शन असल्याने एक नळ कनेक्शन बंद करावे.सदर अर्ज केलेला आहे.

यावर मुख्य लिपीक,कर निरीक्षक,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी आदेशीत केल्या प्रमाणे मालमत्ताधारक अर्जदार यांनी दिनांक २३/०४/१९९८ चे अर्जाबाबत या पुर्वी कारवाई केली.या बाबत वसुली अभिलेख तपासले असता आढळुन येत नाही.

अर्जदार यांनी दिनांक ७/१०/२०१६ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार पाणी पुरवठा फिटर यांनी सदर जागेची दिनांक २७/१०/२०१६ रोजी समक्ष पहाणी करून मिळकतीवर १/२ "एक नळकनेक्शन असल्याबाबत रिपोर्ट दिलेला आहे.

तसेच समक्ष पाहणी अहवाल मध्ये फिटर ,हेडफिटर,शाखा अभियंता,पाणी पुरवठा अधिकारी यांनी नळ कनेक्शन बाबत पहाणी करून अहवाल देण्यात आलेला आहे.तथापी अहवाल माहितीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, क्ष /शासकीय लेखापरिक्षणात आक्षेप आल्यास संबंधीत कर्मचा-यास जबाबदार धरून मुळ प्रस्तावानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार 'क्ष' प्रमाणे मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.दयाराम हंसराज राछ,प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांवा रोड,वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.३०७ येथील एकचा मिळकतीवर दोन नळ कनेक्शन ची नोंद झाली असल्याने प्रत्यक्षात एकच नळ कनेक्शन असल्याने रक्कम रूपये ४८४५१/- निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- प्रत्यक्ष पहाणी केली आहे का.

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- प्रत्यक्ष पहाणी केल्या बाबत फिटर यांचा रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- तुम्ही समक्ष पहाणी परत करा.मागच्या वेळी असेच विषय आले होते. तेथे दोन कनेक्शन होते.समक्ष खात्री करून ध्या.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.दयाराम हंसराज राछ,प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांवा रोड,वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.३०७ येथील एकचा मिळकतीवर दोन नळ कनेक्शन ची नोंद झाली असल्याने प्रत्यक्षात एकच नळ कनेक्शन असल्याने रक्कम रूपये ४८४५१/- निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री.दयाराम हंसराज राछ,प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांवा रोड,वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.३०७ येथील एकच मिळकतीवर दोन नळ कनेक्शन ची नोंद झाली असल्याने प्रत्यक्षात एकच नळ कनेक्शन असल्याने रक्कम रूपये ४८४५१/- निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १७ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे कामाचे या कामासाठी दर निश्चिती कामी मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग

**संदर्भ :-** १) ई निविदा क्र.१५४०

२) दि.११/०४/२०१८ रोजीची छाननी समितीतील वाटाघाटी बाबत बैठक

३) मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दि.१२/०४/२०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की,विषयांकित कामाची ई - निविदा क्र.१५४० अहमदनगर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि.२४/०५/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.परंतु सदर निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याने एकुण १२ वेळेस मुदतवाढ देण्यात आलेली होती.शुध्दीपत्रक क्र.१३ दि.०४/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले.तद्नंतर दिनांक १५/०१/२०१८ रोजी स्क्रन शॉट पाहिला असता एक निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले.

ई - निविदेची पुढील प्रक्रिया पार पाडून सदर निविदेचा दि.१८/०१/२०१८ रोजी तांत्रिक लिफाफा शाखा अभियंता,पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे उपस्थित उघडण्यात आला असता मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांची एक निविदा प्राप्त झाली.

ई - निविदा क्र.१५४० १) मे.सुनिल सेवा,अहमदनगर

ई - निविदा क्र.१५४० मधील तांत्रिक लिफाफा क्र.१ च्या सोबतच्या अहवालात नमुद केलेल्या तपशीला प्रमाणे निविदाधारकाने सदर कामासाठी दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली.निविदा व अटी शर्तीनुसार मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी GST प्रमाणपत्र,अनुभवी कर्मचारी यांची यादी,टाक्या स्वच्छता करणेसाठी असलेली यंत्रसामुग्री/मशिनरी बाबतची माहिती व इनकम टॅक्स व सेल्स टॅक्स भरले बाबतचे ३ वर्षाचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे दिली नसल्याचे निदर्शनास आले.त्यानुसार दि.१९/०१/२०१८ रोजी मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी त्वरीत कागदपत्रांची पुर्तता इकडेस केली.दि.२०/०२/२०१८ रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आला.त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क | कामाचा तपशील | पाण्याच्या टाक्यांचा प्रकार | दर/प्रति लिटर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या सर्व टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे बाबत | बैठी टाकी | ०.०७ सात पैसे प्रति लिटर |
| | | उंची टाकी | ०.१० दहा पैसेप्रति लिटर |

सदरचे दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचेशी दि.११/०४/२०१८ रोजी मा.उपायुक्त,सा यांचे दालनात मा.निविदा छाननी समिती समोर वाटाघाटी झाली.वाटाघाटी दरम्यान मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांना बैठी टाकी साठी रू.०.०३ पैसे प्रति लिटर व उंच टाकीसाठी रू.०.०४ पैसे प्रति लिटर प्रमाणे काम करणेस मा.छाननी समितीकडून सुचविण्यात आले.

त्यानुसार दि.१२/०४/२०१८ रोजी मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी लेखी पत्र देवून मा.निविदा छाननी समितीने सुचविलेल्या दरामध्ये बदल करून सुधारीत दर खालील प्रमाणे देवून या दराने काम करणेस तयार असले बाबत कळविले आहे.

बैठी टाकी रू.०.०४(४ पैसे) प्रति लिटर

उंच टाकी रू.०.०४(४ पैसे) प्रति लिटर

यास्तव अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे कामी मा.निविदा छाननी समिती समोर झालेल्या वाटाघाटी नुसारचे दर व निविदाधारक मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी दि.१२/०४/२०१८चे पत्रान्वये दिलेल्या दराचा यापूर्वी १२ वेळेस दिलेली मुदतवाढ व गेली एक वर्षापासुन टाक्या स्वच्छ केलेल्या नसून त्यांनी त्यांच्या पत्रात दिलेल्या दरा बाबत योग्य तो निर्णय होणे गरजेचे आहे.

तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता ,शाखा अभियंता यांचा अभिप्राय असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावा.

यावर शाखा अभियंत यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,शहरातील नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करणे कामी शहरातील पाणी पुरवठा साठवणूक टाक्या आधुनिक पध्दतीने साफ करणेसाठी ई - निविदा प्रसिध्द करणेत आली.१२ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर एकच निविदा प्राप्त झाली.त्यामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दर प्राप्त झालेने दि.११४/०४/२०१८ रोजी मा.छाननी समिती समोर वाटाघाटी होवून बैठी टाकी ३ पैसे प्रतिलिटर व उंची टाकी साठी ४ पैसे प्रतिलीटर प्रमाणे काम करणेची शिफारस केली.सदरचे दर मान्य नसून बैठी टाकी व उंच टाकी साफ करणेसाठी ४ पैसे प्रतिलीटर प्रमाणे दर मान्य होणेस मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी दि.१२/०४/२०१८चे लेखीपत्रान्वये मागणी केली.

मागील एक वर्षापासून निविदा प्रक्रीयेस प्रतिसाद न मिळाल्याने पाण्याच्या साठवण टाक्या साफ झालेल्या नाहीत.लवकरच पावसाठा सुरू होत असलेने पाण्याच्या टाक्या अधिनिक पध्दतीने साफ करून घेणे गरजेचे आहे.

करिता मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक १२/०४/२०१८ चे पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार बैठी टाकी व उंच टाकी प्रत्येकी ४ पैसे प्रति लिटर प्रमाणे दर मान्य करणे उचित वाटते.

दर अंतिम होणेस मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असलेने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडें सादर करणे,मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे दरा बाबत अंतिम निर्णयासाठी मा.स्थायी समिती कडे सादर करणे उचित राहिल.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या फेरसादर अहवालानुसार 'अ' प्रमाणे दर निश्चितीबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे कामाचे या कामासाठी दर निश्चिती कामी मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या बाबत माहिती दया.

मा.श्री.सागर बोरूडे :- १२ वेळा हे टेंडर रिकॉल झाले आहे.एवढा महत्वाचा विषय असतांना,एक वर्षा पासून नागरीक दुषीत पाणी पीत आहे.यापेक्षा मोठी लान्छनास्पद गोष्ट नाही.नागरीकांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.या करीता महानगरपालिका वचन बध्द आहे.परंतु आपण नागरीकांना दुषीत पाणी पाजत असतो.हि कोणती पध्दत आहे.१२ वेळा टेंडर रिकॉल होते.प्रशासनाने या कडे लक्ष देवून ही वेळ येवू देवू नये.पाणी ही दैनंदिन गरजेची गोष्ट आहे.पाणी जीवणावश्यक गोष्ट आहे.या बाबत इतकी अक्षम्य घोडचूक झालेली आहे.या बाबत संबंधीतांवर जबाबदारी निश्चीत करून कारवाई करावी.मागील वर्षी दुषीत पाण्यामुळे शहरात भयानक परिस्थीती निर्माण झाली होती.पाण्यामुळे कावीळ व इतर आजारांची साथ आली होती.महानगरपालिका लोकांच्या जीवाशी खेळत आहे.कावीळ मोठयाप्रमाणात झाल्यावर माणुस दगावतो.

मा.सभापती साहेब :- एवढा वेळ का लागला याची माहिती दया.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या अधुनिक पध्दतीने स्वच्छ करणे च्या कामा साठी आपण मार्च २०१७ पासुन निविदा प्रसिध्द करीत होतो.एकुण १२ वेळेस मुदत वाढ दिली.१३ व्यावेळी मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांची निविदा प्राप्त झाली.

मा.सभापती साहेब :- १२ वेळेस कोणचीच निविदा प्राप्त झाली नाही का.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- एकही निविदा प्राप्त झाली नाही.त्यामुळे काम करता आले नाही.

मा.श्री.सागर बोरूडे :- पण त्यात काहीतरी पर्याय असेल ना.मागील ठेकेदाराला मुदवाढ दिली असती तर

मा.सभापती साहेब :- १२ वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली.त्याकाळात टाक्या धुतल्या की,नाही.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- नाही स्वच्छ करण्यात आल्या.

मा.सभापती साहेब :- या मध्ये किती कालावधी गेला.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- दिड वर्षाचा कालावधी गेला.

मा.सभापती साहेब :- दिड वर्षाच्या आधी जो ठेकेदार होता त्यालाच पुन्हा मुदतवाढ का दिली नाही.इतर कामांमध्ये जर दुसरा ठेकेदार आला नाही तर पहिला ठेकेदार काम करतो.त्याला सांगायला पाहिजे होत का सांगीतले नाही.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- सन २०१५ मध्ये आपण त्याला काम दिले होते.त्यावेळी एक वर्षाचा कालावधी होता.एप्रिल २०१६ पर्यत त्यानंतर सुध्दा काही दिवस मुदत वाढ दिली होती.त्यानंतर तो म्हणाला कि,दर वाढले आहेत मला परवडत नाही.

मा.सभापती साहेब :- त्याला किती दर होता.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- पहिली नेमणूक केली होती.त्यावेळी २ पैसे प्रति लिटर दर होता.

मा.सभापती साहेब :- मग त्यांनी दर भरलेच नाही का.मला ४ पैसे पाहिजे ५ पैसे पाहिजे.

पा.पु.विभाग,अभियंता श्री.गाडळकर :- १२ वेळा रिकॉल केले त्यावेळेस कोणीहि निविदा भरली नाही.१३ व्या वेळी ७ पैसे प्रति लिटरने उंच टाकी साठी ३ पैसे लिटर बैठी टाकी साठी.असे दर सुनिल सेवा या संस्थेने भरले होते.त्यामध्ये वाटाघाटी करून उंच टाकी ४ पैसे प्रति लिटर व बैठी टाकी ४ पैसे प्रति लिटरने अंतिम केले आहेत.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- हा संपुर्ण शहराचा प्रश्न आहे.तुम्ही जावून पहा,टाक्यांमध्ये कीती घाण असेल.सध्या पावसाळा चालू आहे.येणारे पाणी सुध्दा अशुध्द असते.त्यात टाक्यांमध्ये घाण असल्यावर कसे होईल.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे या कामासाठी मे.सुनिल सेवा यांनी दि.१२/०४/२०१८चे लेखीपत्रान्वये व मा.छाननी समिती समोर झालेल्या वाटाघाटी प्रमाणे बैठी टाकी व उंच टाकी साफ करणेसाठी ४ पैसे प्रतिलीटर प्रमाणे दरास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची आधुनिक पध्दतीने स्वच्छता करणे या कामासाठी मे.सुनिल सेवा,अहमदनगर या संस्थेच्या लेखीपत्रान्वये व मा.छाननी समिती समोर झालेल्या वाटाघाटी प्रमाणे बैठी टाकी व उंच टाकी साफ करणेसाठी ४ पैसे प्रतिलीटर प्रमाणेच्या दरास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १८ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणे कामी ई - निविदा क्र.१६२३ दि.०८/११/२०१७ मधील प्राप्त दरास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग**

**संदर्भ :-** १. ई- निविदा क्र.१६२३

२. जा.क्र. सार्व . बांधकाम विभाग ५६५ दि.२/७/२००८ अन्वये आदेश

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की, केडगाव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणेकामी ई - निविदा क्र.१६२३ दिनांक ८/११/२०१७ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेचा दि.७/१२/२०१७ रोजी ट्रॅकींग शॅाट पाहिला असता एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने सदर निविदेस मुदतवाढ देण्यात आली.

तद्नंतर मुदतवाढी नुसार दि.२६/१२/२०१७ रोजी निविदेचा स्क्रीन शॅाट पाहिला असता एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर निविदांच्या तांत्रिक लिफाफा दि.२८/१२/२०१७ रोजी संबंधीत शाखा अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे उपस्थितीत उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**ई - निविदा क्र.१६२३** १] मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर
२] आर.एन. कातोरे, संगमनेर
३] रवीराज इंजिनिअर्स , कोल्हापूर

ई - निविदा क्र.१६२३ मधील तांत्रिक लिफाफा क्र.१ च्या सोबतच्या अहवालात नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे निविदाधारकांनी सदर कामासाठी ३ निविदाधारकांच्या तांत्रिक कागदपत्रांची पडताळणी केली असता सर्व कागदपत्रे यथायोग्य आढळून आलेले असल्याने तांत्रिक कागदपत्रांचा अहवाल मा. छाननी समिती सदस्यांकडे सादर केला.

त्यानुसार मा. निविदा छाननी समिती सदस्यांकडून संबंधित निविदाधारकांची तांत्रिक कागदपत्रे निविदा अटी शर्ती नुसार यथायोग्य असल्याबाबत खातरजमा करून त्यानंतर सदर निविदांचा व्यापारी लिफाफा दि.१५/१/२०१८ रोजी उघडण्यात आला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | मे. एस. आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर | ०.०१ टक्के कमी |
| २ | आर. एन. कातोरे , संगमनेर | ११.७५ टक्के जादा |
| २ | मे. रवीराज इंजिनिअर्स, कोल्हापूर | ११.२५ टक्के जादा |

विषयांकित कामी ई-निविदा क्र.१६२३साठी मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचे प्राप्त निविदा दर हे सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर हे अंदाजपत्रकीय रक्कम रू.९२,०७,०२३/-पेक्षा ०.०१% कमी दराने काम करणेस तयार आहेत. म्हणजेच याकामी एकूण रक्कम रूपये ९२,०६,१०२/-इतका खर्च येत आहे.

संदर्भिय क्र. २ पारित आदेशामध्ये "रक्कम रूपये ५०,०००/- वरील अंदाजपत्रकीय दराच्या किंवा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या सर्व निविदा छाननी समितीसमोर ठेवणेची आवश्यकता नाही" असे नमूद केले आहे.

यास्तव विषयांकित कामी मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन , अहमदनगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा पेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली निविदा स्विकृत करणेस, तद्नुसार याकामी येणा-या एकुण रक्कम रूपये ९२,०६,१०२/- चे खर्चास मंजुरी मिळणेसह पुढील कार्यवाही करणे कामी मंजूरी मिळणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.मेकॅ. इंजि. यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही. "अ" बाबत निविदा वाटाघाटी समिती समोर वाटाघाटी साठी बोलावण्यास हरकत नाही.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की, मा.फेरसादर, सार्व . बांधकाम विभाग जा.क्र.५६५ दि.२/७/२००८ अन्वये रक्कम रूपये ५०,०००/- चे वरील प्राप्त निविदा निविदा दरापेक्षा कमी दराची प्राप्त असल्यास वाटाघाटी साठी मा.छाननी समितीची आवश्यकता नाही ---- निविदा मा.छाननी समितीपुढे सादर करणे मान्यतेस फेरसादर

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही. अहमदनगर महानगरपालिका सार्व . बांधकाम विभाग यांचे जा.क्र.५६५ दि.२/७/२००८ मधील अ.क्र.२ प्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नसावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील "अ" प्रमाणे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणे कामी ई - निविदा क्र.१६२३ दि.०८/११/२०१७ मधील प्राप्त दरास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती दया.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- केडगांव पाणी योजना ही आपली जवळपास पुर्ण झाली आहे.जी काही आपण मागवीलेली निविदा होती सन २००८-०९ मध्ये आपण वर्कऑर्डर दिली होती. त्यानंतर जे काम झाले आहे.वर्कीग पिरीयड मध्ये आपण जो काही डी.पी.आर.बनविला त्या मध्ये छोटया-छोटया गल्ली बोळा या एस्टीमेंट मध्ये नव्हत्या.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- काम अर्धवट का राहीले.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- का अर्धवट राहिले नाही. छोटया-छोटया गल्ली बोळा या एस्टीमेंट मध्ये नव्हत्या.या कामा करीता पी.एम.सी.नेमण्यात आली होती.पी.एम.सी.ने सर्व्हे केला होता.ज्यावेळी आम्ही काम करतांना आमच्या निदर्शनास आले.त्यानुसार आम्ही सदरचा प्रस्ताव दाखल केला आहे.यापुर्वी सुध्दा हा प्रस्ताव २०/२/१८ रोजी दाखल स्थायी समिती कडे दाखल केला होता.

मा.श्री.संजय शेंडगे :- हा विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणे कामी ई - निविदा क्र.१६२३ दि.०८/११/२०१७ मधील प्राप्त दरास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव वितरण व्यवस्था राबविणे कामी ई - निविदा क्र.१६२३ दि.०८/११/२०१७ मधील मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन , अहमदनगर यांच्या प्राप्त दरास व याकामी येणा-या एकुण रक्कम रूपये ९२,०६,१०२/- चे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुवर्णा जाधव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- १९ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ अंतर्गत विविध ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग**

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प सन.२०१६-२०१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन ई - निविदा मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या **http://amc. maharashtra. etenders. in** या वेबसाईटवर दि.०१/०९/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.सदर ई - निविदा क्र.१५७५ या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दिलेल्या चौथ्या मुदतवाढनुसार आवश्यकतेप्रमाणे १ निविदा प्राप्त असल्यामुळे सदर निविदेचा दि.२७/११/२०१७ रोजी तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असता प्राप्त १ निविदा धारक मे.ए.सी.कोठारी यांच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आल्यानंतर कागदपत्रे तपासणीसाठी सदर प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांना तपासणीसाठी दि.२८/११/२०१७ रोजी पाठविले असता त्यांनी दि.०८/१२/२०१७ रोजीच्या ई मेल द्वारे कागदपत्रे तपासणी बाबतचा अहवाल पाठविला असता प्राप्त अहवालानुसार ठेकेदार यांची निविदा अटी व शर्तीनुसार अपुर्तता असल्याने त्यांना दि.१२/१२/२०१७ रोजी रोजीच्या मे.ए.सी.कोठारी यांच्या अर्जान्वये निविदा अटी व शर्तीनुसार पुर्तता केली असता सदरची पुर्तता कागदपत्रे सदर प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांना फेर तपासणीसाठी दि.१२/१२/२०१७ रोजी पाठविले असता त्यांनी दि.१३/१२/२०१७ रोजीच्या ई मेल द्वारे सदरच्या पुर्ततेनुसार व्यापारी लिफाफा उघडण्यास हरकत नसल्याचे कळविले असल्याने संबंधित ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांच्या निविदेच्या दराचा व्यापारी व्यापारी लिफाफा मा.उपायुक्त (कर) यांचे मान्यतेने दि.२०/१२/२०१७ रोजी निविदेचा दराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १५७५ | Development of Green Spaces at various 11 places of AMC under Amrut Scheme for year 2016-17 | १,५३,१८,७२९/- | मे.ए.सी.कोठारी४९.४९% जादा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी.कोठारी यांची निविदा ४९.४९% जादा दराने प्राप्त झाली असल्याने चालु दरसुचीशी तुलना करुन जी.एस.टी.सह व जी.एस.टी.व्यतिरिक्त दराचे पृथःकरणासह अहवाल पाठविणे बाबत दि.२२/१२/२०१७ रोजी पी.एम.सी.कडे ई मेल द्वारे मागणी केली.तद्‌नंतर पी.एम.सी.ने दि.१०/०१/२०१८ रोजी सदोष तुलनात्मक तक्ता पाठविला होता.तुलनात्मक तक्त्याचा योग्यतो अहवाल पाठविणे बाबत नमुन्यासह दि.१८/०१/२०१८ रोजी ई मेल द्वारे पी.एम.सी.कडे मागणी केली.तद्‌नंतर पी.एम.सी.ने दि,२७/०२/२०१८ रोजीच्या ई मेल द्वारे सदरचा दर चालु दरसुचीनुसार ११.७४ % जादा येत असल्याचे कळविले तथापि सदर बाबत मा.आयुक्त यांचे समवेत दि.२८/०३/२०१८ झालेल्या बैठकीत सदर

तुलनात्मक तक्ता सदोष असल्याने झालेल्या चर्चेनुसार योग्यतो तुलनात्मक तक्ता दि.३१/०३/२०१८ रोजी सादर करणे बाबत मा.आयुक्त यांनी आदेशित केले होते.

तथापि पी.एम.सी.ने दि.०३/०४/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे अभिप्रायसह तुलनात्मक तक्ता सादर केला असुन त्यानुसार सदरचा दर सन.२०१७-१८ च्या चालुदरसुचीनुसार जी.एस.टी.सह ११.५९% जादा येत असल्याचे नमुद केले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | चालू एस.एस.आर. नुसारचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५७५ | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प सन.२०१६-२०१७ अंतर्गत विविध ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे | रु.१,५३,१८,७१९/- | ४९.४९% जादा दराने | ११.५९% जादा |

तरी वरील नमुद प्रमाणे प्राप्त झालेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार सदरचा दर सन.२०१७-१८ च्या चालुदरसुचीनुसार जी.एस.टी.सह ११.५९% जादा येत असल्याने व सदरचा पी.एम.सी.ने सादर केलेल्या सोबतच्या तुलनात्मक तक्त्यानुसार संबंधित ठेकेदार यांना मा.आयुक्त यांचे दालनात दराच्या वाटाघाटीबाबत दि.१२/०४/२०१८ रोजी दु,१२:०० वा.उपस्थित राहणेस समक्षात सांगितले असता मा.आयुक्त यांचे दालनात वाटाघाटीसाठी आयोजित केलेल्या बैठकीस मा.आयुक्त, मा.प्र.शहर अभियंता, मा.प्र.उप अभियंता श्री.के.वाय.बल्लाळ व ठेकेदार मे.ए.सी.कोठारी हे उपस्थित होते.

तथापि सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संबंधित ठेकेदार सदरची कामे कोणत्या दराने करणेस तयार आहेत याबाबतचे लेखी पत्र त्यांनी २ दिवसात देण्याचे कबुल केले होते तथापि तसे लेखी पत्र सादर केलेले नसल्यामुळे उपरोक्त निविदेबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही.उपरोक्त कामांचे कार्यारंभ आदेश देणे बाबत वारंवार शासन स्तरांवरुन विचारणा होत आहे.सदरचे पत्र देणेबाबत वेळोवेळी समक्षात तसेच भ्रंणध्वनीवरुन देखील सांगितले आहे.परंतु ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी काहीही पत्र दिलेले नसल्याने सदरची कामे कोणत्या दराने करणेस तयार आहात याबाबतचे लेखी पत्र इकडेस ३ दिवसात सादर करावे अन्यथा सदरच्या निविदांबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे इकडील जा.क्र.१२६ दि.२५/०४/२०१८ अन्वये कळविले.त्यावर मे.ए.सी.कोठारी यांनी दि.०२/०५/२०१८ च्या अर्जान्वये सदर कामामध्ये आमचे दर अनुक्रमे १५९३ ही निविदा ७.८६% जादा व १५७५ ही निविदा ११.५९% जादा म्हणजेच अंदाजपत्रकाप्रमाणे आहे.त्याप्रमाणे आंम्ही निविदा Speciation प्रमाणे त्यामध्ये काम सुरु झाल्यापासुन सहा महीने त्याची देखभाल दुरुस्ती (पाणी मारणे, वॉचमन ठेवणे, खत घ्यालणे व झाडाची निगा राखणे) इत्यादी कामे आम्ही करण्यास तयार आहोत म्हणजे आमची निविदा चालू सुची प्रमाणे १५९३ = + ७.८६%, १५७५ = + ११.५९% करण्यास तयार आहोत.तरी वरील प्रमाणे आमची निविदा जूर करावी ही विनंती.

परंतु विषयांकित कामाच्या निविदेबाबत जाद दर नमुद केलेले आहेत.आंम्ही त्यावर खालील प्रमाणे मुद्दे नमुद करीत आहोत.

१) सदर निविदेमध्ये ३ वर्षाची देखभाल दुरुस्ती तसेच रखवालदार नेमावयाचा आहे.सदर बाबीसाठी खूप खर्च येणार आहे.सदर खर्चाची तरतुद निविदा मध्ये नाही.
२) सर्व वृक्षास खते, पाणी, औषधे देण्यासाठी विजेचा आणि पाण्याचा खर्चाची तरतुद निविदे मध्ये नाही.
३) निविदा शर्तीनुसार सुरक्षा रक्कम अदा करण्याचा कालावधी खुप आहे.त्यामुळे आंम्हास मोठी आर्थिक तरतुद करावी लागणार आहे.
४) निविदामध्ये कामे वेहवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे आंम्हाला कामाचे नियोजन व देखभाल करण्यावर फार त्रासदायक होणार आहे.

त्यामुळे आंम्ही वरील बार्बींचा विचार करुन निविदेमध्ये दर + ४९.४९% जादा टाकला होता परंतु आपण वरील १ ते ४ क्रमांकाचा विचार चालू दरसुची मध्ये केलेला दिसुन येत नाही.जर महापालिकेने विज, पाणी, झाडाला आवश्यक असलेली खते, औषधे उपलब्ध करुन तसेच वॉचमन व देखभाल दुरुस्तीसाठी माळी हा स्वत: करावे किंवा त्याचा योग्यतो मोबदला आंम्हास दिल्यास आंम्ही ३ वर्षे देखभाल दुरुस्ती करु त्यानंतर आपल्या ताब्यात देऊ.तरी वरील बार्बींचा विचार करुन निविदा मंजुर करावी हि विनंती दि.०२/०५/२०१८ रोजी लेखी अर्ज सादर केला. तद्नंतर ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त यांचे आदेशान्वये जा.क्र.३५३ दि.२४/०५/२०१८ अन्वये दि.०२/०५/२०१८ रोजी दिलेल्या दरानुसार पुन:श्च वाटाघाटीसाठी दि.२८/०५/२०१८ रोजी दु.४:०० वा. बोलावण्यात येवुन वाटाघाटी करण्यात आल्या.

सदरच्या बैठकीस मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी,न.पा.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर श्री.नि़तीन कापडनीस, प्र.शहर अभियंता श्री.व्हि.जी.सोनटक्के , प्र.उपअभियंता श्री.के.वाय.बल्लाळ, तसेच श्री.ऩवगीरे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे व ठेकेदार मे.ए.सी.कोठारीचे भागीदार श्री.ऱसिक कोठारी हे उपस्थित होते.उपरोक्त विषयांकीत निविदेच्या कामाबाबत सर्वासमक्ष सविस्तर चर्चा झाली सदर चर्चेमध्ये ठेकेदाराने वर नमुद केलेप्रमाणे पुन:श्च चर्चा करुन वाढीव दराने निविदा मंजुर करण्याची विनंती केली.

त्यावर मा.जिल्हाधिकारी तथा मा.प्र.आयुक्त यांनी ठेकेदाराला तीन वर्षे देखभाल ऐवजी दोन वर्षाचा देखभाल दुरुस्तीचा पर्याय ठेवण्यात आला.त्यासही ठेकेदाराने असमर्थता व्यक्त केली.नि़विदेमधीलअटी व शर्तीनुसार अट क्र.४८ नुसार " Watch and Ward " मध्ये ठेकेदाराने वृक्षाची देखभाल एक वर्ष करावयाची असून एक वर्षासाठी व्यवस्थापन करणेबाबत ठेकेदाराने तयारी दर्शविली. तथापि त्यांनी एक वर्षानंतर वॉचमन व विज यांचा खर्च महानगरपालिकेने करावा असे निश्चित केले.

सदर बाब मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर तथा मा.प्र.आयुक्त यांनी महानगरपालिकेकडे सदर प्रकल्पावर देणेसाठी अतिरिक्त निधी नाही अशी स्पष्ट वस्तुस्थिती मांडली.महानगरपालिकेची बिकट अवस्था पाहता मध्यम मार्ग म्हणून सर्व खर्चासह ठेकेदाराने सदर कामे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम सुरु झाल्यापासून एका वर्षापर्यंत व्यवस्थित करावीत असे सर्वानुमते ठरले.सदर पर्याय व्यवहार्य असल्याने मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार व ठेकेदारासह उपस्थित सदस्य यांनी शिफारस केलेनुसार ठेकेदाराने ई - निविदा क्र.१५७५ निविदा रक्कम रु.१,५३,१८,७१९/- चे काम निविदा दराने करण्याचे मान्य केले आहे.व त्यास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.सोबत सदर बैठकीचे इतिवृत्त जोडले असुन त्यानुसार ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र सादर केले आहे.

तरी ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र सादर केल्याप्रमाणे उपरोक्त कामाची निविदा मा.स्थायी समितीकडे मंजुरीस्तव तथा निर्णयास्तव पाठविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रभारी उप शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,निविदा अंतिम होणेसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असलेले सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा आभिप्राय की,इतिवृत्त प्रत सोबत असून त्यावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समकालीन डिझाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.पुणे यांची स्वाक्षरी दिसुन येत नाही.प्रस्तावित केल्या प्रमाणे विभागाने मा.स्थायी समितीकडे निविदा दराने मंजुरीसाठी सादर करणे उचित वाटते.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत हरित क्षेत्र विकसित करणे सन २०१६-१७ साठी ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे या साठी प्राप्त निविदा वाटाघाटी अंती निविदा दराने करण्यास निविदा धारक यांनी तयारी दर्शविली असल्याने मंजुरीसाठी सदर निविदा स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालामधिल मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार पुर्ततेसह फेरसादर करावे.

यावर प्रभारी उप अभियंता यांचा अभिप्रया की,मा.फेरसादर,सोबतच्या अहवालामधील मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायाची (त्रुटीची) पुर्तता केली आहे.तरी सादर केलेप्रमाणे अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालामधील पान क्र .T -१३ नुसार प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर कारणे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्श स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ अंतर्गत विविध ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या नुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- माहिती दया,आकरा ठिकाणे कोणती आहेत ते सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- आयोध्या नगर,आराध्या पार्क,गणपती मंदिर,कानडे मळा,मातोश्री उदयान,विरंगुळा मैदान,कर्डिले निवास,फुले नगर,भुषन नगर,तारा बाग इ.

मा.सभापती साहेब :- या ठिकाणी उदयाने आहेत का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- उदयाने आहेत.हे काम या पुर्वी श्री.सातपुते यांच्या कडे होते.अमृत योजने अंतर्गत परंतु सध्या ते निलंबीत असल्याने सध्या हे काम आम्ही बल्लाळ साहेबांकडे दिलेले आहे.रू.१ कोटी ३४ लाखाची निविदा आहे. ४९.४९% जादाची भरली होती.वाटाघाटी अंती निविदा दराने करायला तयार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- निविदा जास्तीची भरायला काही बंधन नाही का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- नाही तो त्याच प्रश्न आहे.किती दर भरायचे.तसे त्यांनी कारण दयायला पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- उदयान विकास म्हणजे काय करणार आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या मध्ये ८० % रक्कम वृक्षरोपण करण्या करीता आहे.व २०% सिव्हील वर्क साठी आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोणते झाडे लावणार

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- झाडाचे आयुष्य कमीत कमी ५ वर्ष असले पाहिजे.

मा.सभापती साहेब :- पाच वर्ष मेंन्टनन्स त्यांच्या कडे राहिल का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- एक वर्षाकरीता मेंन्टनन्स त्यांच्या कडे आहे.नंतर महानगरपालिकेकडे हॅन्डओव्हर करणार आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :-हे काम केव्हा पुर्ण होणार.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- हे काम मागेच सुरू व्हायला पाहिजे होते.परंतु निविदेच्या वाटाघाटी आणि जादा दर भरल्यामुळे विलंब झाला आहे.डिसेंबर पर्यत काम पर्ण करायला पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- वाटाघाटी कोणी केली.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या आधी श्री.मंगळे साहेब आयुक्त असतांना त्यांच्या समोर झाली होती.त्यावेळी ठेकेदाराने दर कमी केले नव्हते.त्यानंतर आत्ता प्र.आयुक्त तथा मा.जिल्हाधिकारी यांच्या समोर वाटाघाटीमध्ये निविदा दाराला मान्यता दिली.

मा.सभापती साहेब :- या ठिकाणां मध्ये बदल करायचे असेल ऐवढया दिवसांमध्ये काही ठिकाणी कामे झालेली असल्यास,गरज नसल्यास त्या जागा बदलून आत्यावश्यक ठिकाणी उदयान विकसीत करण्यात यावेत.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या मध्ये अशी काही उदयाने आली आहेत,त्या ठिकाणी गरज नाही.उदा.गणपती मंदिर ही जागा उदयान मध्ये धरलेली आहे.

मा.सभापती साहेब :- अशी काही ठिकाणे असतील तर ते ठिकाणे रद्द करून दुसरे नविन ठिकाण घेण्यात यावे.

प्र.उप शहर अभियंता श्री.बल्लाळ :- या जागा निवडलेल्या आहेत या करीता जो आभ्यास करायला पाहिजे होता तो केलेला नाही.हे क्लीअर दिसते आहे.विरंगुळा मैदान ही जागा शाळे करीता आरक्षीत आहे.त्या ठिकाणी आपल्याला बगीचा करता येणार नाही.गणपती मंदिराची जागा आहे.ती आपण ट्रस्टला दिलेली आहे.ट्रस्टला दिलेली जागा आपण विकसीत करण्याचा प्रश्न येत नाही. ही जागा आपण मा.शासनच्या मान्यतेने दिलेली आहे.यामधील ज्या जागा त्यांनी निश्चीत केलेल्या त्याजागेची मालकी सर्व गोष्टी तपासुनच जागा विकसीत होतील.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक १९ व २० मंजूर करण्यात यावा

मा.सौ.दिपाली बारस्कर :-विषय क्रमांक १९ व २० मंजूर करण्यात यावा

मा.सभापती साहेब :- मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ अंतर्गत विविध ११ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र.१५७५ अंतर्गत निविदा रक्कम रु.१,५३,१८,७१९/- चे काम निविदा दराने ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना विविध ११ ठिकाणी उदयान विकसीत करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २० सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१५९३ अंतर्गत विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग**

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प सन.२०१५-२०१६ अंतर्गत फेर निविदा क्र.२ ई - निविदा क्र.१५९३ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन ई - निविदा मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या **http://amc. maharashtra. etenders. in** या वेबसाईटवर दि.०६/१०/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर ई - निविदा क्र.१५९३ मधील प्राप्त १ निविदा धारक मे.ए.सी.कोठारी यांच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आल्यानंतर कागदपत्रे तपासणीसाठी सदर प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांना फेर तपासणीसाठी दि.२८/११/२०१७ रोजी पाठविले असता त्यांनी दि.०८/१२/२०१७ रोजीच्या ई मेल द्वारे कागदपत्रे तपासणी बाबतचा अहवाल दि.०८/१२/२०१७ रोजी ई मेल द्वारे पाठविला असता प्राप्त अहवालानुसार ठेकेदार यांची निविदा अटी व शर्तीनुसार पुर्तता नसल्याने त्यांना पुर्तता करणेस दि.०८/१२/२०१७ रोजी ऑनलाईन कळविले असता त्यांनी दि.११/१२/२०१७ रोजी रोजीच्या अर्जान्वये निविदा अटी व शर्तीनुसार पुर्तता केली असता सदरची पुर्तता कागदपत्रे सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांना फेर तपासणीसाठी दि.१२/१२/२०१७ रोजी पाठविले असता त्यांनी दि.१३/१२/२०१७ रोजीच्या ई मेल द्वारे सदरच्या पुर्ततेनुसार व्यापारी लिफाफा उघडण्यास हरकत नसल्याचे कळविले असल्याने संबंधित ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांच्या निविदेच्या दराचा व्यापारी व्यापारी लिफाफा मा.उपायुक्त (कर) यांचे मान्यतेने दि.२०/१२/२०१७ रोजी निविदेचा दराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १५९३ | Development of Green Spaces at various 12 places of AMC under Amrut Scheme for year 2015-16 | 1,34,79,078/- | मे.ए.सी.कोठारी ४९.४९% जादा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी.कोठारी यांची निविदा ४९.४९% जादा दराने प्राप्त झ ाली असल्याने चालु दरसुचीशी तुलना करुन जी.एस.टी.सह व जी.एस.टी.व्यतिरिक्त दराचे पृथःकरणासह अहवाल पाठविणे बाबत दि.२२/१२/२०१७ रोजी पी.एम.सी.कडे ई मेल द्वारे मागणी केली.तद्नंतर पी.एम.सी.ने दि.१०/०१/२०१८ रोजी सदोष तुलनात्मक तक्ता पाठविला होता.तुलनात्मक तक्त्याचा योग्यतो अहवाल पाठविणे बाबत नमुन्यासह दि.१८/०१/२०१८ रोजी ई मेल द्वारे पी.एम.सी.कडे मागणी केली.तद्नंतर पी.एम.सी.ने दि,२७/०२/२०१८ रोजीच्या ई मेल द्वारे सदरचा दर चालु दरसुचीनुसार ८.०१ % जादा येत असल्याचे कळविले तथापि सदर बाबत मा.आयुक्त यांचे समवेत दि.२८/०३/२०१८ झालेल्या बैठकीत सदर तुलनात्मक तक्ता सदोष असल्याने झालेल्या चर्चेनुसार योग्यतो तुलनात्मक तक्ता दि.३१/०३/२०१८ रोजी सादर करणे बाबत मा.आयुक्त यांनी आदेशित केले होते.तथापि पी.एम.सी.ने दि.०३/०४/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे

अभिप्रायसह तुलनात्मक तक्ता सादर केला असुन त्यानुसार सदरचा दर सन.२०१७-१८ च्या चालुदरसुचीनुसार जी.एस.टी.सह ७.८६% जादा येत असल्याचे नमुद केले आहे.त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | चालू एस.एस.आर. नुसारचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५९३ | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प सन.२०१५-२०१६ अंतर्गत विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे. | रु.१,३४,७९,०७८/- | ४९.४९% जादा दराने | ७.८६% जादा |

तरी वरील नमुद प्रमाणे प्राप्त झालेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार सदरचा दर सन.२०१७-१८ च्या चालुदरसुचीनुसार जी.एस.टी.सह ७.८३% जादा येत असल्याने व सदरचा दर अवाजवी वाटत असल्याने पी.एम.सी.ने सादर केलेल्या सोबतच्या तुलनात्मक तक्त्यानुसार संबंधित ठेकेदार यांना मा.आयुक्त यांचे दालनात दराच्या वाटाघाटीबाबत दि.१२/०४/२०१८ रोजी दु,१२:०० वा.उपस्थित राहणेस समक्षात सांगितले असता मा.आयुक्त यांचे दालनात वाटाघाटीसाठी आयोजित केलेल्या बैठकीस मा.आयुक्त, मा.प्र.शहर अभियंता, मा.प्र.उप अभियंता श्री.के.वाय.बल्लाळ व ठेकेदार मे.ए.सी.कोठारी हे उपस्थित होते.

तथापि सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संबंधित ठेकेदार सदरची कामे कोणत्या दराने करणेस तयार आहेत याबाबतचे लेखी पत्र त्यांनी २ दिवसात देण्याचे कबुल केले होते तथापि तसे लेखी पत्र सादर केलेले नसल्यामुळे उपरोक्त निविदेबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही.उपरोक्त कामांचे कार्यारंभ आदेश देणे बाबत वांरवार शासन स्तरांवरुन विचारणा होत आहे.सदरचे पत्र देणेबाबत वेळोवेळी समक्षात तसेच भ्रंणध्वनीवरुन देखील सांगितले आहे.परंतु ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी काहीही पत्र दिलेले नसल्याने त्यांना सदरची कामे कोणत्या दराने करणेस तयार आहात याबाबतचे लेखी पत्र इकडेस ३ दिवसात सादर करावे अन्यथा सदरच्या निविदांबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे इकडील जा.क्र.१२६ दि.२५/०४/२०१८ अन्वये कळविले . त्यावर मे.ए.सी.कोठारी यांनी दि.०२/०५/२०१८ च्या अर्जान्वये सदर कामामध्ये आमचे दर अनुक्रमे १५९३ ही निविदा ७.८६% जादा व १५७५ ही निविदा ११.५९% जादा म्हणजेच अंदाजपत्रकाप्रमाणे आहे.त्याप्रमाणे आंम्ही निविदा Speciation प्रमाणे त्यामध्ये काम सुरु झाल्यापासुन सहा महीने त्याची देखभाल दुरुस्ती (पाणी मारणे, वॉचमन ठेवणे, खत घ्यालणे व झाडाची निगा राखणे) इत्यादी कामे आम्ही करण्यास तयार आहोत म्हणजे आमची निविदा चालू सुची प्रमाणे १५९३ = + ७.८६%, १५७५ = + ११.५९% करण्यास तयार आहोत.तरी वरील प्रमाणे आमची निविदा मंजूर करावी ही विनंती.

परंतु विषयांकित कामाच्या निविदेबाबत जाद दर नमुद केलेले आहेत.आंम्ही त्यावर खालील प्रमाणे मुद्दे नमुद करीत आहोत.

१) सदर निविदेमध्ये ३ वर्षाची देखभाल दुरुस्ती तसेच रखवालदार नेमावयाचा आहे.सदर बाबीसाठी खूप खर्च येणार आहे.सदर खर्चाची तरतुद निविदा मध्ये नाही.

२) सर्व वृक्षास खते, पाणी, औषधे देण्यासाठी विजेचा आणि पाण्याचा खर्चाची तरतुद निविदे मध्ये नाही.

३) निविदा शर्तीनुसार सुरक्षा रक्कम अदा करण्याचा कालावधी खुप आहे.त्यामुळे आंम्हास मोठी आर्थिक तरतुद करावी लागणार आहे.

४) निविदामध्ये कामे वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे आंम्हाला कामाचे नियोजन व देखभाल करण्यावर फार त्रासदायक होणार आहे.

त्यामुळे आंम्ही वरील बाबींचा विचार करुन निविदेमध्ये दर + ४९.४९% जादा टाकला होता परंतु आपण वरील १ ते ४ क्रमांकाचा विचार चालू दरसुची मध्ये केलेला दिसुन येत नाही.जर महापालिकेने विज, पाणी, झाडाला आवश्यक असलेली खते, औषधे उपलब्ध करुन तसेच वॉचमन व देखभाल दुरुस्तीसाठी माळी हा स्वतः करावे किंवा त्याचा योग्यतो मोबदला आंम्हास दिल्यास आंम्ही ३ वर्षे देखभाल दुरुस्ती करु त्यानंतर आपल्या ताब्यात देऊ.तरी वरील बाबींचा विचार करुन निविदा मंजुर करावी हि विनंती असा दि.०२/०५/२०१८ रोजी लेखी अर्ज सादर केला. तद्नंतर ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त यांचे आदेशान्वये जा.क्र.३५३ दि.२४/०५/२०१८ अन्वये दि.०२/०५/२०१८ रोजी दिलेल्या दरानुसार पुनःश्च वाटाघाटीसाठी दि.२८/०५/२०१८ रोजी दु.४:०० वा. बोलावण्यात येवुन वाटाघाटी करण्यात आल्या.

सदरच्या बैठकीस मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी,न.पा.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर श्री.नितीन कापडनीस, प्र.शहर अभियंता श्री.व्हि.जी.सोनटक्के, प्र.उपअभियंता श्री.के.वाय.बल्लाळ, तसेच श्री.नवगीरे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, समकालिन डिसाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे व ठेकेदार मे.ए.सी.कोठारीचे भागीदार श्री.रसिक कोठारी हे उपस्थित होते.उपरोक्त विषयांकीत निविदेच्या कामाबाबत सर्वासमक्ष सविस्तर चर्चा झाली सदर चर्चेमध्ये ठेकेदाराने वर नमुद केलेप्रमाणे पुनःश्च चर्चा करुन वाढीव दराने निविदा मंजुर करण्याची विनंती केली.

त्यावर मा.जिल्हाधिकारी तथा मा.प्र.आयुक्त यांनी ठेकेदाराला तीन वर्षे देखभाल ऐवजी दोन वर्षाचा देखभाल दुरुस्तीचा पर्याय ठेवण्यात आला.त्यासही ठेकेदाराने असमर्थता व्यक्त केली.निविदेमधीलअटी व शर्तीनुसार अट क्र.४८ नुसार " Watch and Ward " मध्ये ठेकेदाराने वृक्षाची देखभाल एक वर्ष करावयाची असून एक वर्षासाठी व्यवस्थापन करणेबाबत ठेकेदाराने तयारी दर्शविली. तथापि त्यांनी एक वर्षानंतर वॉचमन व विज यांचा खर्च महानगरपालिकेने करावा असे निश्चित केले.

सदर बाब मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर तथा मा.प्र.आयुक्त यांनी महानगरपालिकेकडे सदर प्रकल्पावर देणेसाठी अतिरिक्त निधी नाही अशी स्पष्ट वस्तुस्थिती मांडली.महानगरपालिकेची बिकट अवस्था पाहता मध्यम मार्ग म्हणून सर्व खर्चासह ठेकेदाराने सदर कामे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम सुरु झाल्यापासून एका वर्षापर्यंत व्यवस्थित करावीत असे सर्वानुमते ठरले.सदर पर्याय व्यवहार्य असल्याने मा.जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार व ठेकेदारासह उपस्थित सदस्य यांनी शिफारस केलेनुसार ठेकेदाराने ई - निविदा क्र.१५९३ निविदा रक्कम रु.१,३४,७९,०७८/- चे काम निविदा दराने करण्याचे मान्य केले आहे.व त्यास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.सोबत सदर बैठकीचे इतिवृत्त जोडले असुन त्यानुसार ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र सादर केले आहे.

तरी ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांनी सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र सादर केल्याप्रमाणे उपरोक्त कामाची निविदा मा.स्थायी समितीकडे मंजुरीस्तव तथा निर्णयास्तव पाठविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रभारी उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,निविदा अंतिम होणेसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असलेने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,ईतिवृत्ताची प्रतीवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार स्थळकालीन डिझाईन्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.पुणे यांची स्वाक्षरी दिसुन येत नाही.प्रस्तावित केल्याप्रमाणे विभागाने मा.स्थायी समितीकडे निविदा दराने मंजुरीसाठी सादर करणे उचित राहिल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,सन २०१५-१६ या वर्षासाठी हरित क्षेत्र विकसीत करणे अमृत योजने अंतर्गत १२ ठिकाणी उदयाने विकसित करण्यासाठी प्राप्त निविदा वाटाघाटी निविदा दराने काम करण्यास निविदा धारक तयार असल्याने सदरचा विषय मंजुरीसाठी स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवाला मधिल मुलेप यांचे अभिप्रायानुसार पुर्ततेसह फेरसादर करावे.

यावर प्रभारी उप शहर अभियंता यांचा अभिप्राय की,फेरसादर,सोबतच्या अहवालामधील मुख्यलेखापरिक्षक यांनी नमुद अभिप्रायाची (त्रुटीची) पुर्तता केली आहे.तरी सादर केले प्रमाणे अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालामधिल पान नं T १२ नुसार प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१५-१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१५९३ अंतर्गत विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या नुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- माहिती दया,आकरा ठिकाणे कोणती आहेत ते सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- आयोध्या नगर,आराध्या पार्क,गणपती मंदिर,कानडे मळा,मातोश्री उदयान,विरंगुळा मैदान,कर्डिले निवास,फुले नगर,भुषन नगर,तारा बाग इ.

मा.सभापती साहेब :- या ठिकाणी उदयाने आहेत का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- उदयाने आहेत.हे काम या पुर्वी श्री.सातपुते यांच्या कडे होते.अमृत योजने अंतर्गत परंतु सध्या ते निलंबीत असल्याने सध्या हे काम आम्ही बल्लाळ साहेबांकडे दिलेले आहे.रू.१ कोटी ३४ लाखाची निविदा आहे. ४९.४९% जादाची भरली होती.वाटाघाटी अंती निविदा दराने करायला तयार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- निविदा जास्तीची भरायला काही बंधन नाही का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- नाही तो त्याच प्रश्न आहे.किती दर भरायचे.तसे त्यांनी कारण दयायला पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- उदयान विकास म्हणजे काय करणार आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या मध्ये ८० % रक्कम वृक्षरोपण करण्या करीता आहे.व २०% सिव्हील वर्क साठी आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोणते झाडे लावणार

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- झाडाचे आयुष्य कमीत कमी ५ वर्ष असले पाहिजे.

मा.सभापती साहेब :- पाच वर्ष मेंन्टनन्स त्यांच्या कडे राहिल का.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- एक वर्षाकरीता मेंन्टनन्स त्यांच्या कडे आहे.नंतर महानगरपालिकेकडे हॅन्डओव्हर करणार आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- हे काम केव्हा पुर्ण होणार.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- हे काम मागेच सुरू व्हायला पाहिजे होते.परंतु निविदेच्या वाटाघाटी आणि जादा दर भरल्यामुळे विलंब झाला आहे.डिसेंबर पर्यत काम पर्ण करायला पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- वाटाघाटी कोणी केली.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या आधी श्री.मंगळे साहेब आयुक्त असतांना त्यांच्या समोर झाली होती.त्यावेळी ठेकेदाराने दर कमी केले नव्हते.त्यानंतर आत्ता प्र.आयुक्त तथा मा.जिल्हाधिकारी यांच्या समोर वाटाघाटीमध्ये निविदा दाराला मान्यता दिली.

मा.सभापती साहेब :- या ठिकाणां मध्ये बदल करायचे असेल ऐवढया दिवसांमध्ये काही ठिकाणी कामे झालेली असल्यास,गरज नसल्यास

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- या मध्ये अशी काही उदयाने आली आहेत,त्या ठिकाणी गरज नाही.उदा.गणपती मंदिर ही जागा उदयान मध्ये धरलेली आहे.

मा.सभापती साहेब :- अशी काही ठिकाणे असतील तर ते ठिकाणे रद्द करून दुसरे नविन ठिकाण घेण्यात यावे.

प्र.उप शहर अभियंता श्री.बल्लाळ :- या जागा निवडलेल्या आहेत या करीता जो आभ्यास करायला पाहिजे होता तो केलेला नाही.हे क्लीअर दिसते आहे.विरंगुळा मैदान ही जागा शाळे करीता आरक्षीत आहे.त्या ठिकाणी आपल्याला बगीचा करता येणार नाही.गणपती मंदिराची जागा आहे.ती आपण ट्रस्टला दिलेली आहे.ट्रस्टला दिलेली जागा आपण विकसीत करण्याचा प्रश्न येत नाही. ही जागा आपण मा.शासनच्या मान्यतेने दिलेली आहे.यामधील ज्या जागा त्यांनी निश्चीत केलेल्या त्याजागेची मालकी सर्व गोष्टी तपासुनच जागा विकसीत होतील.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय क्रमांक १९ व २० मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- विषय क्रमांक १९ व २० मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र. १५९३ अंतर्गत विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास सन प्रकल्प २०१६-१७ अंतर्गत ई - निविदा क्र. १५९३अंतर्गत निविदा रक्कम रु. १,३४,७९,०७८/- मधील काम निविदा दराने ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना विविध १२ ठिकाणी उद्यान विकसित करणे या कामास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २१ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे ई- निविदा क्र.१२३८ प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी. रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एमएम व्यासाची पाईप गटर करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

**संदर्भ :-** १) मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांचा कार्यारंभ आदेश जा.क्र.१३५ दिनांक १८/०६/२०१६

२) मे. विकास इंडिया प्रा.लि.पी.एम.सी.,पुणे यांचा पत्र/ अहवाल दि.२६/०४/२०१८

३) श्री.अभय आगरकर,नगरसेवक मनपा अहमदनगर यांचे पत्र दि.

४) मा.महापौर यांचे पत्र दि.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,कामाची माहिती अहवाल खालील प्रमाणे .

**कामाचे नांव :-** ई निविदा क्र.१२३८ प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी.रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एम एम व्यासाची पाईप गटर करणेचे काम

पहिले धावते देयक रू. १३,३९,१०८/-

व्दितीय धावते देयक रू.४३,०४,१७४/-

तृतीय धावते देयक रू. ४४,९९,२९९/-

--------------------

एकुण रू. १,०१,४२,५८१/-

निविदा क्र.१२३८

लेखाशिर्षक :- प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-१६

तांत्रिक मान्यता :- जा.क्र.१० दि.२१/०४/२०१५ रक्कम रू.१,०१,५३,३४०/-

निविदा रक्कम :- रू.१,०१,५३,३४०/-

कार्यारंभ आदेश :- १३५ दि.१८/०६/२०१८ (निविदा दराने)

ठेकेदार :- मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर

मुदत :- ४ महिने मुदतवाढ दि.३१/०५/२०१८

उपरोक्त काम प्रभाग क्र.२५ व २७ मधील कल्याण रोड परिसरातील मोठया भागाचे जलनिस्सारण व्यवस्थेसाठी मुख्यवाहिनी १२०० एमएम व्यासाची प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यादेशित ठेकेदाराकडून काम चालू आहे.सदरचे कामाचा उतार भौगोलिक जमीनीच्या उताराप्रमाणे काम प्रस्तावित प्रमाणे प्रगतीत होते.दरम्यान प्रस्तावित डी.पी.रस्ता मनपाकडे हस्तांतरीत होणेची कार्यवाही मुदतीत न झाल्याने त्याव्यतीरीक्तच्या भागात काम चालू होते.परंतु प्रत्यक्षात हस्तांतरीत झालेला डी.पी.रस्तयाची दिशा भौगोलिक प्रवाहाच्या वेगळया बाजुला असल्यामुळे प्रत्यक्षात सुमारे ३०० मी.लांबी बाढली.तसेच अंदाजपत्रकातील खोदाईची खोलीपेक्षा देखील प्रत्यक्षातील खोदाई वाढली व चेंबरचा अंदाजपत्रकातील प्रभार व खोली व संख्या यामध्ये देखील वाढ झाली. त्याबाबत पी.एस.सी.बाबतने संदर्भिय पत्राव्दारे अहवाल दिलेला आहे.तो खालीलप्रमाणे.

मुळ अंदाजपत्रकीय रक्कम / निविदा रक्कम :-१,०१,५३,३४०/-

प्रत्यक्षात करावयाच्या कामाची रक्कम :- १,४९,६८,३०६/-

वाढ झालेली रक्कम :- रू.४८,००,९३७/-

जादा बाब रक्कम रू.२४,९१,९७१/-

उपरोक्त प्रस्तावातील राहिलेले काम सखल व काळया मातीतील आहे.त्यामुळे तसेच उताराप्रमाणे लाईनचे काम अंतिम प्रवाहापर्यत पुर्ण करणे आत्यावश्यक आहे व सदरचे काम पावसाळयापुर्वी पुर्ण देखील गरजेचे आहे.त्यामुळे रक्कम रू.४८,००,९३७/- इतकी तरतुद होणे गरजेचे आहे.त्यावरील निधीकरिता ४० कोटी मधील बचत रकमेतून किंवा १४ व्या वित्त आयोग किंवा त्यातील रकमेच्या व्याजातून किंवा अन्य मनपा निधी उदा.विकास भार किंवा बांधकाम अंतर्गत सुधारणा इत्यादी लेखाशिर्षकातून रक्कम वर्ग होणे उचित वाटते.तसेच काम अत्यावश्यक असल्याने निविदा दराने मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर या ठेकेदाराकडून करणे योग्य तसेच चेंबरमधील बदलास E.I.R.L.(जादा बाब) देखील त्यास बरोबर मंजुर होणे उचित.

येणेप्रमाणे रिपोर्ट मान्यतेस तथा आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियांता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्येतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,विभागाचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,नियमानुसार उचित निर्णयासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे ई- निविदा क्र.१२३८ प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी. रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एमएम व्यासाची पाईप गटर करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या नुसार ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- मुलभुत सोई सुविधा या लेखाशिर्षा अंतर्गत पावसाळी १२०० एमएम व्यासाची पाईप गटर करणेबाबतचा प्रस्ताव केला होता.परंतु मुळ निविदे मध्ये रस्ता पुर्णपणे ताब्यात नसल्यामुळे सर्व्हे करायला गेलो त्यावेळी गणना झालेली नाही.त्यामुळे गटारीची लांबी वाढलेली आहे.एस्टीमेंट मध्ये दिडमीटर खोली धरलेली आहे.परंतु प्रत्यक्षात आपल्याला दोन ते अडिच मिटर तर काही ठिकाणी आपल्याला साडेतीन मीटर पर्यत खोदाई करावी लागलली आहे. जे काम आपण प्रोग्रेस केले ते काम आपल्याला डायरेक्ट सीना नदी पर्यत न्यावे लागणार आहे.सीना नदी पर्यत गेले नाही तर आदर्श कॉलनी व कल्याण रोडचा जो भाग आहे.या भागातील सांडपाण्याचा प्रश्न तसाच राहणार आहे.त्यामुळे वाढीव कामाचा प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार ई निविदा क्र.१२३८ प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी.रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एम एम व्यासाची पाईप गटर करणे या कामाच्या वाढीव रक्कम रूपये ४८,००,९३७/- च्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार प्रभाग क्र.२५ मध्ये आदर्श कॉलनी आणि विद्यानगर डी.पी.रस्त्याचे मध्ये पावसाळी १२०० एम एम व्यासाची पाईप गटर करणे ई निविदा क्र.१२३८ चे ठेकेदार श्री.मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांचे काम मंजूर असून वाढीव खर्च रक्कम रू.४८,००,९३७/- इतकी तरतुद करण्यास, निधीकरिता ४० कोटी मधील बचत रकमेतून किंवा १४ व्या वित्त आयोग किंवा त्यातील रकमेच्या व्याजातून किंवा अन्य मनपा निधी उदा.विकास भार किंवा बांधकाम अंतर्गत सुधारणा इत्यादी लेखाशिर्षकातून रक्कम वर्ग करण्यास तसेच काम अत्यावश्यक असल्याने या ठेकेदाराकडून करण्यास तसेच चेंबरमधील बदलास E.I.R.L.(जादा बाब)मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर या कामाच्या वाढीव रक्कम रूपये ४८,००,९३७/- च्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २२ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १६८२ या निविदेच्या निविदा दराच्या वाटाघाटीबाबत प्रभाग क्र. ३१ मध्ये कायनेटीक चौकाजवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

**संदर्भ :-** १) मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे पत्र दि.

२) सौ.विद्या दिपक खैरे,नगरसेविका यांचे पत्र दि.०३/०५/२०१८ सां.बा.वि.आवक क्र.१०८४ दि.०४/०५/२०१८ अन्वये.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-१८ अंतर्गत ई -निविदा क्र.१६८२ ई टेंडर पध्दतीने ऑनलाईन ई निविदा मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या http://amc.maharashtra.etenders.In या वेबसाईटवर दि.२५/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.सदर निविदेस दिलेल्या दुस-या मुतदवाढनुसार एकच निविदा प्राप्त झाली.लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची छाननी व पडताळणी केली असता सादर केलेली कागदपत्रे यथायोग्य आढळून आलेले मा.उपायुक्त (कर) यांच्या मान्यतेने दि.१३/०४/२०१८ रोजी सदर निविदांच्या व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदा दारपेक्षा |
|---|---|---|---|---|
| १६८२ | प्र.क्र.३१ मध्ये कायनेटीक चौका जवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ३४,७५,५१४/- | मे.बेस्ट कंन्स्ट्र.कंपनी | १०.००% जादा दराने |

सदरचे काम नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-१८ मधून सदर कामास मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ विषय क्रमांक ६३ दि.२९/१२/२०१७ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे.मा.नगरसेविका यांनी संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये सदरहू काम "नागरी सुविधा कार्यक्रम " ऐवजी "अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमीयर रक्कम " सन २०१८-१९ मधून प्रस्तावित करणेबाबत कळविले आहे.परंतु सदर कामाचे लेखाशिर्षक बदलल्यानंतर स्पर्धात्मकदृष्टया सदर कामाची पुनश्चः निविदा प्रक्रिया करावी लागणार असल्याने व सदरची प्रक्रियेमध्ये वेळ जाणार असल्याने काम त्याच "नागरी सुविधा विकास कार्यक्रम " लेखाशिर्षकामधून करणे योग्य हाईल याबाबत मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेशी दि.१८/०५/२०१८ रोजी चर्चा झालेली आहे.याबाबत मा.नगरसेविका सौ.विद्या दिपक खैरे यांना अलहिदा कळविणेत येत आहे.

निविदेचा चालु दरसुचीचा अहवाल खालीलप्रमाणे

A) निविदा रक्कम :- ३४,७५,५१४/-

B) निविदा देकार :- निविदा दरापेक्षा १०%जादा दर

C) निविदा देकारासह रक्कम :- रू.३८,२३,०६२/-

D) चालु दरसुची (सां.बां.ई.डी.एस.आर.सन २०१७-१८) :- रू.३७,३८,६१८/-

E) चालु दरसुचीपेक्षा निविदा रक्कम :- २.२६% जादा

F) चालु दरसुचीला निविदा रक्कम :- ७.५७% जादा

वरील तुलनात्मक तक्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या नमुद निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्र.कंपनी,अहमदनगर यांनी सदरची निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने भरलेली होती.परंतु चालु दरसुचीशी निविदा देकाराची तुलना कली असता २.२६% जादा येत आजे.त्यामुळे सदरचा देकार १०% ऐवजी ७.५७% जादा दराने करणेस ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्र.कंपनी,अहमदनगर यांनी दि.१५/०५/२०१८ रोजी काम करण्यास तयार असलेबाबत पत्र दिलेले आहे.त्यानुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांची निविदा दरापेक्षा ७.५७% इतके जादा दराने म्हणजे चालु दरसुचीनुसार म्हणजे निविदा रक्कम रू.३४,७५,५१४/- + ७.५७% जादा = रू.३७३८६१०/- + १२%GST/= ४१,८७,२४४/- इतके रक्कमेस मान्यतेस मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस विनंती रिपोर्ट सादर तसेच मंजुर लेखाशिर्षक नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१८-१९मधुन प्रशासकीय मंजुरीस रिपोर्ट सविनय सादर.

लेखाशिर्ष :- नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१८-१९ पा.क्र.७९ अ.क्र.१

तरतुद :- १,००,००,०००/-

या पुर्वीचा खर्च :- निरंक

प्रस्तावित खर्च :- ४१,८७,२४४/-

एकुण खर्च :- ४१,८७,२४४/-

शिल्लक तरतुद :- ५८,१२,७५६/-

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर उपअभियंता यांची स्वाक्षरी.

यावर शहर अभियंता यांचा अहवाल की,यशस्वी निविदाधारक यांनी निविदा दरापेक्षा १०%जादाची निविदा प्राप्त झाली.चालू दरसुचीनुसार म्हणजे सन २०१७-१८ चे दरसूचीनुसार येणारी अंदाजपत्रकीय रक्कम रू.३७,३८,६२८/- यशस्वी निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्र अहमदनगर यांची लेखी संमती असल्यास सदरची निविदा रक्कम रू.३७,३८,६१८/- म्हणजे सन २०१७-१८ चे दरसूचीनुसार अधिक ठेकेदाराने प्रत्यक्षात भरणा केलेली सेवा व वस्तुकराची रक्कम (GST) मनपाने ठेकेदारास अदा केली यासह मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शहर अभियंता यांच्या अभिप्रायाप्रमाणे वरील "अ" नुसार वाढीव दराची निविदा बाबत मा.स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे बाबत विभागाने उचित निर्णय घेता येईल.

नस्तीवर पृष्ठ क्रमांक नोंदविले नाही.वरील अ प्रमाणे निर्णयास्तव मा.स्थायी समितीला सादर करण्याबाबत विभागाला उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवणेसाठी सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालामधील "अ" प्रमाणे चालू दरसूची सन २०१७-१८ नुसार रक्कम रूपये ३७,३८,६१८/- या रकमेस प्रशासकीय मंजूरी देणे उचित होईल.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १६८२ या निविदेच्या निविदा दराच्या वाटाघाटीबाबत प्रभाग क्र. ३१ मध्ये कायनेटीक चौकाजवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या नुसार ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- नागरी सुविधा विकास कार्यक्रम या हेड अंतर्गत किती निधी ची तरतुद आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- दोन कोटींची तरतुद आहे.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- मागच्या वर्षी किती तरतुद होती.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- नोव्हेबर पर्यत एक कोटीच वापरता येणार आहे.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- सन २०१७-१८ मध्ये या मध्ये पाच कोटींची तरतुद होती.त्यावेळी ३७ लाखांचे हाडको मध्ये काम प्रस्तावीत करण्यात आले होते.त्याची निविदा सुध्दा निघाली होती.आता त्याची रक्कम कमी करण्यात आली.त्यामुळे ते काम आता होत नाही.या बाबत काय करता येईल.टेंडर सुध्दा भरले आहे.

प्रभाग अभियंता श्री.पारखे :- मंजुर झालेले आहे.चालु वर्षा मध्ये बजेट नसल्यामुळे काम झालेले नाही.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- नागरी सुविधा विकास कार्यक्रम या हेड मध्ये रक्कम कमी केल्या मुळे ते काम होत नाही.हि तरतुद का कमी करण्यात आली.

प्रभाग अभियंता श्री.पारखे :- उर्वरित ५० % रिलीज होईल त्या वेळी ते काम आपल्याला टाकता येईल.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- ते काम पहिले झाले पाहिजे होते.त्याचे टेंडर सुध्दा मंजूर झाले होते.

मा.सभापती साहेब :- श्री.मानकर साहेब आपण सांगा यावर काय करता येईल.

प्रभाग अभियंता श्री.पारखे :- वास्तविक आयुक्तांच्या ऑर्डर्स होत्या की,जे मंजूर आहेत परंतु काम झालेले नाही.वर्कऑर्डर झालेल्या नाही.ते रद्द करण्यात याव्यात.

मा.सौ.उषा नलवडे :- रस्ता मजबुतीकरण व डांबरीकारण करणे बाबत मी महासभेमध्ये निवेदन दिले होते.प्रभाग क्र.३ मधील.संतनामदेव चौक ते भारव्दाज घर ते शर्मा घर ते गुंजाळ घर रस्ता डांबरीकारण व मजबुती करण त्या बाबत माहिती सांगा.मंजूरी आलेली आहे.महासभेमध्ये सुध्दा यावर चर्चा झाली आहे.मा.सौ.दिपाली ताईचाच प्रभाग आहे हा.

प्रभाग अभियंता श्री.पारखे :- प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

मा.सभापती साहेब :- इतके दिवस कशासाठी लागतात.

प्रभाग अभियंता श्री.पारखे :- बजेट पुस्तक आमच्याकडे आलेले नाही.

मा.सभापती साहेब :- बजेट पुस्तक कशामुळे आले नाही.वर्ष संपत आले तरी बजेट पुस्तक नाही.कोणाकडे आहे पुस्तक छपाई. तुम्ही पुस्तक दिले नाही का.बाकीच्या विभागांना पुस्तक मिळाले का.

मा.सहाय्य आयुक्त श्री.दिनेश गांधी :- रेकॉर्ड विभागा कडे काम आहे.

मा.सभापती साहेब :- कोण काम पहाते रेकॉर्ड विभागाचे

मा.सहाय्य आयुक्त श्री.दिनेश गांधी :- श्री.बालानी काम पहातात.त्यांच्या कडे रेकॉर्ड विभाग व माहिती सुविधा केंद्र चा चार्ज आहे.आज ते रजेवर आहेत.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १६८२ या निविदेच्या निविदा दराच्या वाटाघाटीबाबत प्रभाग क्र. ३१ मध्ये कायनेटीक चौकाजवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१७-२०१८ अंतर्गत ई - निविदा क्र. १६८२ या निविदे मधिल कायनेटीक चौकाजवळील सारस कॉलनी व रविश कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे बाबत. ऑफिस रिपोट मध्ये नमुद केल्या प्रमाणे ७.५७% जादा दराने करणेस ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्र.कंपनी,अहमदनगर यांनी काम करण्यास तयार असलेबाबत पत्रानुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांची निविदा दरापेक्षा ७.५७% इतके जादा दराने म्हणजे चालु दरसुचीनुसार म्हणजे निविदा रक्कम रू.३४,७५,५१४/- + ७.५७% जादा = रू.३७३८६१०/- + १२%GST/= ४१,८७,२४४/- इतके रक्कमेस व नागरी सुविधा विकास कार्यक्रम या लेखाशिर्ष अंतर्गत सन २०१८-१९मधुन प्रशासकीय मंजुरीस सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २३ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह )उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

**संदर्भ :-** दि.२४/०५/२०१८ रोजीचे मा.छाणनी समिती ठरावानुसार.

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये सादर करण्यात येते की,दि.२४/०५/२०१८ रोजी वरील विषया बाबत बैठक मा.उपायुक्त (सा) तथा छाणनी समिती अध्यक्ष यांचे दालनात छाणनी समितीची बैठक पार पडली.सदर बैठकीला मा.उपायुक्त (सा), मा.उपायुक्त (कर),मुख्यलेखाधिकारी व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख उपस्थितीत होते.

त्यानुसार खालील प्रामणे ई निविदेत लघुत्तम निविदाकाराने खालील प्रमाणे दर दाखल केले होते.त्यावर छाणनी समितीने चर्चा केली.

| निविदाकाराचे नांव | निविदेत निविदाकाराने दाखल केलेले दर |
|---|---|
| पी.एच.जाधव | Rs.१४७०/- Per Ton (In Words: Rs One Thousand Four Hundred Seventy Per Metric Ton) Composting & Rs.१४७०/- Per Tan for RDF |

त्यानुसार दिनांक २४/०५/२०१८ रोजी झालेल्या छाणनी समितीतील चर्चेनुसार छाणनी समितीने सुचविलेल्या दर प्रति टन रक्कम रूपये १२००/- हे कंपोस्टिंग व आर डी एफ साठी निविदाकाराने अमान्य करून त्यांनी रक्कम रू.१४५०/- प्रति मे.टन आउट पुट बेसीस वर (खत व RDF प्रत्येक ) या दराने तसेच विक्री केलेल्या खतावर प्रति मे.टन खतावर रक्कम रू.५० /- या प्रमाणे रॉयल्टी मनपाला देण्यास लेखी कळविले आहे.त्यानुसार छाणनी समिती खालील प्रमाणे शिफारस करून ठराव केला आहे.

ठराव :- "याबाबत छाणनी समिती सदस्यांचे बहुमताने शिफारस करीत आहे की,प्रतिटन रक्कम रू.१२००/- हे कंपोस्टींग व आरडीएफ साठी निविदाकाराने दर मान्य करावे.मात्र निविदाकाराने छाणनी समितीच्या शिफारशी नुसार दर मान्य न केल्याने सदर बाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणेकामी ही समिती शिफारस करीत आहे."

त्यानुसार मा.छाणनी समितीने केलेल्या ठरावानुसार सदर बाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणेकामी मंजूरीस्तव पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,ऑडीट सेक्शन

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहील.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.मुख्यलेखापरिक्षक नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील "अ" प्रमाणे छानणी समितीने निश्चित केलेले दर निविदाकारास अमान्य आहेत.

निविदादराने दिलेला दर प्रती टन रू.१४५०/-त्या व्यतिरीक्त रॉयल्टी प्रती टन रू.५०/-मनपास देणे छाननी समितीने बहुमताने शिफारस केलेला दर प्रती टन रू.१२००/- (खत व RDF करीता) सदर शिफारस रू.२५०/- प्रतीटन प्रमाणे कमी आहे.त्या बाबत कोणतेही कारण दिलेले नाही.तरी मा.स्थायी समितीने धारणात्मक निर्णय घेणे उचित होईल.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह )उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार निर्णय घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

घनकचरा विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :-शहरामध्ये जे कचरा निर्माण होतो १६०० ते १३०मे.टन त्या पैकी५०मे.टन तेथे सेक्रीकेशन करून त्यानंतर कंपोस्टींग करणे करीत आपण निविदा मागवीली होती.त्याचा जो लघुत्तम दर आलेला आहे.तो आज मंजूरी करीता मा.स्थायी समितीसमोर ठेवला आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- त्यांनी रेट काय दिलेला आहे.पर डे किती पेड करावे लागतील.वर्षाला किती दयावे लागतील याची माहिती दया.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- आपण ठेकेदाराला डेपोवर नेवून दयावयाचा आहे.तेथे कच-यातील घटक वेगळे करून ज्या घटकांचे कंपोस्ट होवू शकेल.जे रिसायकलींग करता येईल ते वेगळे करणार आहे.ज्यावर काही प्रक्रीया होवू शकणार नाही आशा तीन टाईप मध्ये सेक्रीकेशन करून कंपोस्ट होणा-या मटेरीलचे खतामध्ये रूपांतर करणार आहे.जे खत तयार होईल ते झाले आउटपुट म्हणजे ५० मे.टनापासून आंदाजे १२ ते १५ मे.टन खत तयार होवू शकेल.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- त्यावर आपण त्यांना देणार कि आपण त्यांना दयायचे.

घ.क. व्य. विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- हि सर्व प्रक्रीया करण्यात करीता आपण त्यांना रेट दयायचा आहे.

मा.सभापती साहेब :- छाननी समिती मध्ये कोणकोणते सदस्य होते.निविदाकाराने रू.१४७० निविदेमध्ये रेट दिला होता.छाननी समितीने १२०० रू.रेट कशाच्या आधारे निश्चित केला.रू.१०००/- का नाही दिला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- छाननी समितीला बाटाघाटी करण्याचे आधिकार आहेत का.

मा.सभापती साहेब :- हा रू.१२००/- हो शोध कोणी लावला.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- छाननी समितीला वाटाघाटी करण्याचा अधिकार आहे का.यांना फक्त निविदाकाराच्या कागदपत्रांची छाननी करण्याचा अधिकार आहे.समिती मध्ये कोण आहेत.त्यांनी उत्तरे दया. त्यांचे अधिकार काय आहे.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीमध्ये कोण आहे व रू.१२००/- रेट कसा ठरविला सांगा.

मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :- माझ्या अभिप्रायामध्ये मी दिलेले आहे की,कर कमी करण्याचे कोणतेही कारण दिलेले नाही.छाननी समित सदस्य कारण सांगतील.

मा.सभापती साहेब :- छाननी समिती सदस्यांनी दर कमी करण्याचे कारण सांगा.

मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :- छाननी समितीने दर कमी करण्याचे कारण दयायला पाहिजे.दर कमी करणे बाबत दुमत नाही.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- २४/५/२०१८ रोजी निविदा क्र.१६९४ मधिल बुरूडगांव स.नं.३४पैकी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ची छाननी समिती ची बैठक झाली.या बैठकीस घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर साहेब , वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे

साहेब,मुखलेखाधिकारी श्री.गांधी साहेब ,उपायुक्त कर श्री.कोंडा साहेब ,मुख्यलेखाधिकारी श्री.खरात साहेब ,उपायुक्त तथा छाननी समिती अध्यक्ष श्री.तडवी साहेब यावेळी हजर होते.यावेळी खत प्रकल्पाचा विषय छाननी समिती च्या चर्चेस आले. कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह उभारणे करीता ठेकेदार श्री.जाधव यांनी रू.१४७०/- दर नमुद केलेला होता.सदरचा दर कमी करणे बाबत संबंधीत श्री.जाधव यांना विनंती केली असता श्री.जाधव यांनी नकार दिला.त्यानंतर समितीने रक्कम रू.११००/- करणे बाबत शिफारस केली तथापी श्री.जाधव यांनी त्या दरास नकार दिला.त्यानंतर रू.१२००/- दर करणे करीता सांगण्यात आले.त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांनी रू.१३००/- करणे बाबत सुचित केले.तथापी श्री.जाधव यांनी दर कमी करण्यास नकार देवून त्यामुळे दि.२४/५/२०१८ रोजी छाननी समितीने बहुमताने सदरचा खत प्रकल्पासाठी कंपोस्ट प्लैंट आरडीएफ साठी रू१२००/- प्रति टन दर मान्य करावे अशी छाननी समितीने मा.स्थायी समिती ला शिफारस करणे असा निर्णय घेतला.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीला दर कमी करण्याचे अधिकारी आहेत का.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- छाननी समिती कडे एखादी निविदा प्राप्त होती त्यावेळी निविदे मधील दर अवास्तव आहे किंवा जास्त आहे असे वाटल्यास संबंधित निविदा दरामध्ये वाटाघाटी करून दर कमी करण्या बाबत निविदाकाराकडे मागणी करू शकते.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- मागच्या वेळी आपण खत प्रकल्पावर काही ॲक्शन घेतली नाही.विषय हरीत लवादा कडे गेला.त्यांनी जिल्हाधिका-यांना आदेश दिले.जिल्हाधिका-यांनी आपल्याला पैसे भरण्याचे आदेश दिले.सन २०१४ साली जिल्हाधिका-यांनी रू.१९००/- दर निश्चित केला होता.आज चार वर्षा नंतर छाननी समिती म्हणते रू.१२००/- दर करा.ठेकेदार कसा काय मंजूर करणार आहे.छाननी समितीची इच्छा आहे की पुन्हा विषय जिल्हाधिका-यांकडे जावा.पुन्हा दंड भरावा.मा.हरीत लवादाच्या किती नोटीसा आल्या या बाबत श्री.पैठणकर यांनी अवगत करावे.मा.हरीत लवादाकडे आपल्या महानगरपालिकेची मोठी बदनामी झालेली आहे.त्यांनी आपल्याला वेळोवेळी नोटीसा काढलेल्या आहेत.आपले प्रकल्प तयार नाहीत.आपण त्यांना मुदत देत आहोत.मुदतीमध्ये एक सुध्दा प्रकल्प तयार नाही.अशा परिस्थती असतांना छाननी समिती ला हि गोष्ट अवगत नाही का.मागच्यावेळी मा.जिल्हाधिका-यांकडे हा विषय गेला होता.त्यावेळी रू.१९००/- दर निश्चित केला.महागाई वाढत चालली कि कमी होत चालली आहे.मागच्या वेळी बुरूडगांवच्या लोकांनी कचरा डेपोचा त्रास होत असल्याने आंदोलन केले होते.औरंगाबाद येथे जशी परिस्थिती निर्माण झाली होती तशी परिस्थीती येथे निर्माण करायची का.असे छाननी समितीचे धोरण आहे का.नंतर आपण धावपळ करायची.जोपर्यत आपल्या हातात गोष्ट आहे.तोपर्यत करायला पाहिजे.सावेडी कचरा डेपो येथे मागील काही दिवसांपुर्वी तेथील नागरीकांनी रस्ता रोको केला होता.त्यावेळी सुध्दा टेंडर निघाले नव्हते.निविदा प्रक्रिया चालू होती.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीला दर कमी करण्याचा कोणताही अधिकार नाही.असा नियम आहे.दर कमी का करायचे याचे कारण दया.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- छाननी समिती निविदाकारास दर कमी करणे करीता विनंती करू शकते.अकौंट कोड मध्ये दिलेले आहे.कुठल्याही परिस्थीतीमध्ये उच्च दर उदभुत करणा-या निविदाकारास कमी दर स्विकारण्यास सांगता येणार नाही.चांगले काम समिती कडून होत असतील तर आमचे दुमत नाही.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- बुरूडगांव व सावेडी या दोन्ही कचरा डेपोवर श्री.जाधव यांचे खत प्रकल्प कार्यरत आहेत.त्यांच्या मशिनरी सुध्दा तेथे कार्यरत असल्यामुळे छाननी समितीला दर अवाजवी वाटल्यामुळे शिफारस करण्यात आली.

मा.सभापती साहेब :- पण छाननी समितीला दर कमी करण्याचा अधिकार नाही असा कायदा सांगतो.तुम्हाला दर अवाजवी कसा वाटला याचा खुलासा करा.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- ज्यावेळी छाननी समितीने निर्णय घेतला त्यावेळी बुरूडगांव व सावेडी येथे श्री.जाधव यांचेच प्रकल्प कार्यान्वीत आहेत.

मा.सभापती साहेब :- तुम्हीच त्यांना रू.१९००/- दर दिला.मग आत्ता काय अडचण आली.येथे तुम्हाला अवाजवी वाटतो.त्यावेळी वाटला नाही का.

मा.मु.ले.प. श्री.खरात :- त्यावेळी रू.१९५०/- दिला.आता त्यांना काही इनव्हेंटमेंट करण्याची गरज नाही.

मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- छाननी समिती मध्ये झालेल्या चर्चे मध्ये प्रकल्प उभारणे,प्रकल्प आधीच उभा आहे.त्यामुळे प्रकल्प उभा करण्यासाठी ठेकेदाराला काही खर्च लागणार नाही.म्हणून त्यावेळी सर्वाचे मत पडले की,त्याचा उभारणीचा खर्च कमी आहे.ठेकेदाराचा खर्च फक्त मेंन्टनन्स आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- त्यामुळे ठेकेदाराने दर कमी भरला.मागचा रेट रू.१९००/- होता.आता रू.१४००/- चा आहे.

मा.वै.आ.अधिकारी श्री.बोरगे:- त्यावेळी कोंडा साहेब उपयुक्त होते.सर्वानुमते त्यांनी रू.१२००/-दर त्यांना परवडेल.उभारणीचा खर्च कमी असल्याने.तरी सुध्दा अंतीम निर्णय मा.स्थायी समितीला घ्यायचा आहे.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीने विलंब का लावला.किती वेळा बैठका घेतल्या.

मा.श्री.मुदस्सर शेख :- छाननी समिती कशासाठी आहे.स्टोअर मार्फत आपण खरेदी करतो त्या दराच्या निश्चिती करीता छाननी समिती आहे.ई - टेंडर करीता छाननी समितीची गरज नाही.मग ई - टेंडरचा फायदा काय.

मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- यामध्ये ज्यावळी टेंडर प्रकाशीत झाले.त्यावेळी बेस अमाउंट ठरवायला पाहिजे होती.ती बेस अमाउंट ठरवली नाही.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक १७१ नुसार (१ ) मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की,कलम ९३,पोटकलम (८) मधील तरतुदींच्या आधीन,लघुत्तम दराची निविदा स्वीकारण्यास काही हरकत नसल्यास ती निविदा स्वीकारली पाहिजे.हि लघुत्ता दराची निविदा होती.छाननी समितीला माहित नव्हते का.मा.हरीत लवादाने आपल्याला किती नोटीसा दिल्या आहेत. मा.हरीत लवादा किती वेळा उल्लंघन झाले.

मा.सभापती साहेब :- अशा कारणाने जर छाननी समिती मुळे मा.हरीत लवादाने जर दंड झाला तर याची जबाबदारी छाननी समितीवर निश्चित करायची का.ज्यांच्या मुळे विलंब होत आहे झालेला दंड त्यांच्या पगारातुन वसुल करायचा का.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- बुरूडगांवचा प्रकल्प बंद असल्याने सर्व कचरा सावेडीला चालला आहे.पुन्हा तीच परिस्थीती निर्माण करायची का.रू.१२००/- दरामध्ये तुम्ही ठेकेदार आणा.आम्ही सुध्दा पालिकेच्या हितासाठी येथे आलो आहे.नागरीकांच्या आरोग्याशी खेळणे नाही का.पालिकेच्या हिताला आम्ही सुध्दा बांधील आहोत.पण हि पध्दत नाही.परिस्थिती काय आहे हे आपण पाहिले पाहीजे.मा.हरीत लवादाच्या आदेशाचे उल्लंघन झाले.त्यांची नोटीस आली तर त्याला जबाबदार कोण राहिल.छाननी समितीवर याची जबाबदारी निश्चित करावी.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- ज्यावेळी ई - निविदा क्र.१६९४ छाननी समिती पुढे दि.२४/५/२०१८ रोजी आली होती.त्यावेळी ई - निविदेमध्ये बेस प्रईज निविदेमध्ये नमुद करणे आवश्यक असते.किंवा संबंधीत विभागाला आपण ते किती पर्यत नेवू शकतो.आपल्या हातची किंमत संबंधीत विभागाला माहिती जर नसेल तर संबंधीत छाननी समितीला किती पर्यत निविदा मान्य करायच्या किंवाअमान्य करायच्या याचा

बेस येत नसल्याने केवळ मनपाचे आर्थीक हित लक्षात घेवून आणि श्री.पी.एच. जाधव यांना दोन्ही बुरूडगांव व सावेडी येथील दोन्ही प्रकल्प कार्यान्वीत असल्यामुळे छाननी समितीने रू.१२००/- दर वाटाघाटी अंती निश्चित केला आहे.या बाबत स्थायी समितीने अंतिम निर्णय घेणे उचित राहिल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार कंपोस्टिंग व आर डी एफ साठी रक्कम रू.१४५०/- प्रति मे.टन आउट पुट बेसीस वर (खत व RDF प्रत्येक ) या दराने तसेच विक्री केलेल्या खतावर प्रति मे.टन खतावर रक्कम रू.५० /- या प्रमाणे रॉयल्टी मनपाला देण्यात येईल या अटी नुसार मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- खत प्रकल्प उभारणे करीता ई - निविदा क्र. विदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार कंपोस्टिंग व आर डी एफ साठी रक्कम रू.१४५०/- प्रति मे.टन आउट पुट बेसीस वर (खत व RDF प्रत्येक ) या दराने तसेच विक्री केलेल्या खतावर प्रति मे.टन खतावर रक्कम रू.५० /- या प्रमाणे रॉयल्टी मनपाला देण्यात येईल या अटी नुसार मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट प्लैंट आरडीएफसह )उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार कंपोस्टिंग व आर डी एफ साठी रक्कम रू.१४५०/- प्रति मे.टन आउट पुट बेसीस वर (खत व RDF प्रत्येक ) या दराने तसेच विक्री केलेल्या खतावर प्रति मे.टन खतावर रक्कम रू.५० /- या प्रमाणे रॉयल्टी मनपाला देण्यात येईल या अटी वर ठेकेदार श्री. पी.एच.जाधव यांना देणेस व सदरचा खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधी मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अ.नगर मनपा च्या बुरूडगांव स.नं.३४(पैकी) या ठिकाणी ५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प (कंपोस्ट व RDF प्लैंट सह )उभारणे व ५ वर्षे करीता देखभाल दुरूस्तीसह चालविणे बाबत ई - निविदा क्र.१६९४ मधील प्राप्त दरानुसार कंपोस्टिंग व आर डी एफ साठी रक्कम रू.१४५०/- प्रति मे.टन आउट पुट बेसीस वर (खत व RDF प्रत्येक ) या दराने तसेच विक्री केलेल्या खतावर प्रति मे.टन खतावर रक्कम रू.५० /- या प्रमाणे रॉयल्टी मनपाला देण्यात येईल या अटी वर ठेकेदार श्री. पी.एच.जाधव यांना देणेस व सदरचा खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधी मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २४ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** ई - निविदा क्र.१६६३ मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ओला कचरा प्रति दिन प्रक्रिया करणेकामी २ मे.टन क्षमतेचे तीन ठिकाणी कंपोस्टींग मशीन बसविणे व तीन वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास व येणा-या खर्चास मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

**संदर्भ :-** मा.उपायुक्त (कर) तथा छाननी समिती अध्यक्ष यांच्या दि.८/५/२०१८ रोजीच्या मंजूरी अन्वये

दि.९/५/२०१८ रोजी वरील विषया बाबत बैठक मा.उपायुक्त तथा छाननी समिती अध्यक्ष यांचे दालनात छाननी समितीची बैठक पार पडली.सदर बैठकीला उपायुक्त (सा), उपायुक्त (कर),मुख्यलेखापरिक्षक,मुख्य लेखाधिकारी ,वैद्यकीय आरोग्य अधिकारी व घनकचरा व्यवस्थापन प्रमुख उपस्थितीत होते.सदर बैठकील ई - निविदा क्र.१६६३ मधील लघुत्तम दराचे निविदाकार वेस्टबीन्स सोल्युशन,नागपुर यांच्या सोबत निविदेत दाखल दरा बाबत वाटाघाटी होवून खालील प्रमाणे दरास सेवा उपलब्ध करून देण्यास निविदाकाराने तयारी दर्शविली असून तसे लेखी पत्र सादर केले आहे.

| निविदाकाराचे नांव | निविदेत निविदाकाराने दाखल केलेले दर | वाटाघाटीत निविदाकाराने मान्य केलेले दर |
|---|---|---|
| वेस्टबीन्स सोल्युशन,नागपुर | १) प्रति २ मेट्रीक कंपोस्टींग मशिन बसविणे स्थापित करणे खर्च रूपये ३०,७७,७७७/- (तीस लाख सत्याहत्तर हजार सातशे सत्याहत्तर फक्त सर्व करासहित)<br>२) प्रति वर्ष मशीन चालविणे दर रूपये ११,७७,७७७/- (आकरा लाख सत्याहत्तर हजार सातशे सत्याहत्तर फक्त सर्व करासहित) खताचा विक्रीवर मनपास रॉयल्टी प्रति वर्ष ४०% देण्यात येईल. | १) प्रति २ मॅट्रीक टन कंपोस्टिंग मशीन रक्कम रू.३०,६२,०००/-<br>२) प्रति वर्ष मशीन चालविणे रक्कम रू.११,७०,०००/-<br>३) खताच्या विक्रीवर मनपास रॉयल्टी प्रति वर्ष ४५% देण्यात येईल. |

वरिल तक्याचे नमुद दर वेस्टबीन्स सोल्युशन,नागपुर या एजन्सीचे वाटाघाटीत मान्य केले असून सदर बाबत पत्र दाखल केले आहे.सबब छाननी समिती समोर चर्चा केल्यानुसार निविदाकाराणे सहमती दर्शवली आहे.त्यानुसार वाटाघाटीत मान्य केलेल्या दरास छाननी समिती शिफारस करीत आहे.

येणे प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख,वैदयकीय आरोग्य अधिकारी,मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.

यावर वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,दि.९/५/१८ रोजी छाननी समितीची बैठक झाली.शासनाचे दराबाबत रू.३०लक्ष९६हजार५०० रूपये किंमत असलेबाबत निदर्शनास आणून दिले.त्यामध्ये सध्याचे निविदाकाराने आणखी कपात करून रूपये ३०,६२,०००/- तयारी दर्शविलेली आहे.वार्षिक मेन्टेनन्स बाबत रक्कम रूपये ११,७०,०००/- व खताच्या विक्रीमध्ये ४५% रॉयल्टी देण्याचे मान्य केलेले आहे.एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने पुढील अंतीम निर्णय घेणेकामी मा.स्थायी समितीसमोर ठेवणे उचित होईल.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,ठेकेदाराचे मुळ पत्रासह मा.स्थायी समिती समोर सादर करणे वरिल "अ " प्रमाणे राहील.

यावर उपयुक्त (सा) यांचा अभिप्राय की, T-८० नुसार स्पष्टीकरण होत नाही.तथापी मा.आयुक्त यांचे निर्णयास्तव

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,वैद्यकिय आरोग्य अधिकारी चर्चा करावी.

यावर वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,चर्चा झाली,बांधकाम विषयक बार्बीबाबत शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता आवश्यक असल्याने त्यानुसार शहर अभियंता यांचे अभिप्राय घेणे आवश्यक वाटते.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावित काम कंपोस्टिंग मशिनरी उभारणे व त्याची ३ वर्ष देखभाल दुरूस्ती करणेचे आहे.त्यामध्ये स्वतंत्र्य स्थापत्य कामांचा समावेश नाही.सबब तांत्रिक मान्यता देणे योग्य नाही.स्थापत्य कामांची Stucture Stabilityबाबत निविदा --- यांनी दक्षता घेणे उचित ठरते.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,मा.शहर अभियंता व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा दि.१९/५/१८ च्या अभिप्राय विचारात घेता वेस्टबिन सोल्युशन,नागपूर यांचे दराला अंतिम मान्यतेसाठी व कार्यारंभ आदेश देण्यासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या संचिकेमधील T- ५८ वरील मुळ आक्षेपासह अभिप्रय कायम आहेत.निविदा प्रक्रिया मध्ये स्पर्धात्मक दर उपलब्ध झालेले नाहीत.तसेच सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळाचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे.तसेच अंदाजपत्रकीय रक्कमेस सार्वजनिक बांधकाम विभाग (मेकॅनिकल) यांचे तांत्रिक मान्यता घेणे उचित राहिल.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्थायी समितीकडे पाठवावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई - निविदा क्र.१६६३ मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ओला कचरा प्रति दिन प्रक्रिया करणेकामी २ मे.टन क्षमतेचे तीन ठिकाणी कंपोस्टींग मशीन बसविणे व तीन वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास व येणा-या खर्चास मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- स्वच्छ भारत अभियान चा आपल्या महानगरपालिकेचा डी.पी.आर.मा.शासनाकडे पाठविला का?

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :-स्वच्छ भारत अभियान चा जो डी.पी.आर आहे.आपण राज्य शासनाकडे पाठविला आहे.मा.राज्य शासनाने त्यांची जी टेक्नीकल कमीटी आहे.महाराष्ट्र जीवन प्रधीकरण यांच्याकडे तो पाठविला होता.मनपा त्यांनी काही प्रश्न विचारले आहेत. उदा.घंटा गाडयांचे वय कीती आहे.त्यानुसार आपण घंटागाडया आर.टी.ओ.कडे तपासणीसाठी पाठविल्या होत्या त्यांनी २ दिवसांपुर्वी उत्तर दिलेले आहे.३०घंटागाडया पैकी१०घंटागाडया रिपेअर होवू शकणार नाहित.बाकीच्या रिपेअर होवू शकतील.त्याअनुशंगाने हे सर्व उत्तरे नाशिक एम.जी.पी.ला पाठवायची आहेत.ती पाठविल्यानंतर नाशिक एम.जी.पी. तांत्रिक मान्यता देईल.त्यानंतर मा.शासन अंतिम मंजूरी देईल.

मा.सभापती साहेब :- आपण जर लवकरात लवकर केले तर मा.शासन आपल्याला रू.३० ते ३२ कोटी देईल.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- २८ कोटी ५६ लाख रूपये देईल.

मा.सभापती साहेब :- लवकरात लवकर नाशिला पाठवा.जेणे करून आपल्याला निधी उपलब्ध होईल.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- दोन दिवसांमध्ये या बाबत कार्यवाही होईल.

मा.सभापती साहेब :- दोन दिवसांत नक्की कार्यवाही करावी.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- जो पर्यत डी.पी.आर.मंजूर होत नाही.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- डी.पी.आर.च्या बाबती मध्ये मा.शासनाचा जो आदेश आहे. डी.पी.आर च्या अनुषांगाने जे पैसे खर्च करायचे आहे.आपला जो सहभाग आहे.तो सोडून उर्वरित जो निधी असेल त्याच्यातुन आपण कामे करू शकतो.त्यामुळे डी.पी.आर मंजूर झाल्या नंतर प्रत्येक महानगरपालिकेच्या नांवने जो मा.शासन आदेश काढत आहे.तो प्रत्येक महानगरपालिकेला बंधनकारक आहे.तोपर्यत ज्या आत्यावश्यक सेवा आहेत.त्या थांबविता येणार नाही.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- सभापती साहेब सौरउर्जा प्रकल्प येणार होता त्याचे काय झाले.

मा.सभापती साहेब :- निकम साहेब याबाबत माहिती सांगा.

मा.मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- अहमदगनगर महानगरपालिकेला अमृत अभियांन योजने अंतर्गत सोलर पॉवर प्रकल्प राबविणेसाठी २८.७५ कोटी इतकी रक्कम मंजूर झालेली आहे.त्यानंतर मा.शासनाने महाराष्ट्र जीवन प्रधिकरण यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती दिली आहे.त्यांच्या मार्फत सोलरचा प्रोजेक्ट डी.पी.आर.मंजूर करून तो ग्रीन कनेक्टीवीटी मान्यतेसाठी आपण मेडा कडे सादर केला होता.त्यानंतर मेडा ने तो महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांच्या कडे त्याची फयुजीबीलीटी चेक करण्याकरीता पाठविला होता.त्यांनी नुकतीच फयुजीबीलीटी चेक करून मागच्या ३० तारखेला राज्य स्तरीय कमीटी असते त्या कमीटीने त्याला ऑप्रोल दिलेला आहे.आणि तो आता मेडा कडे अंतीम मंजूरी करीता गेलेला आहे.

मा.सभापती साहेब :- मेडा कडे अंतीम मंजूरीला गेला आहे.ती अंदाज किती दिवसांनी मिळेल.

मा.मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- अंतीम मंजूर या आठवडयात येणे अपेक्षीत आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्याला जो लाईट बीला पोटी दिड ते दोन कोटींचा खर्च येतो.प्रकल्प झाल्या नंतर आपले ५० लाख रूपये तरी वाचतील.त्यामुळे लवकरात लवकर निविदा काढा.

मा.सभापती साहेब :- मेहेत्रे साहेब,आपण आचारसंहिता असतांना मंजूरी दिली.६२ कोटींचा प्रकल्प होता.

मा.प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- प्रधानमंत्री आवाय योजनेचे दोन डी.पी.आर. मंजूर झाले आहेत.सेंट्रल ची मंजूरी आलेली आहे.टेंडर प्रसिध्द केले आहे.१५ दिवसांमध्ये मा.स्थायी समिती कडे मंजूरीकरीता विषय येणार आहे.

मा.सभापती साहेब :- पी.एम.सी.ची निविदा येईल का.

मा.प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- हो, पी.एम.सी.ची निविदा येईल.

मा.सभापती साहेब :- किती दिवसांमध्ये येईल.

मा.प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- १ कोटींचे काम असल्यामुळे एक महिन्याची मुदत देण्यात आली होती.आत्ताच त्याची प्रीबीड मीटींग झाली आहे.१५ दिवसांमध्ये मा.स्थायी समिती कडे तो विषय मंजूरी करीता येईल.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- पैठणकर साहेब तीन ठिकणी कंपोस्टिंग मशीन बसविणार म्हणजे तीन ठिकाणचा खर्च किती होणार.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.पैठणकर :- ज्या ठिकाणी ओला कचरा निर्माण होतो.त्याठिकाणी त्यावर प्रोसेस करणे बाबत आपण निविदा काढली होती.निविदा काढणे करीता आपल्याला एन.जी.टी.सांगीतलेले आहे.सुचविलेले आहे.व मा.शासनाचे सुध्दा धोरण असे आहे की,शक्यतो कचरा डेपोवर जाणारा कच-याचा लोड कमी होईल.अशा पध्दतीने कार्यवाही केली पाहिजे.त्याप्रमाणे आपण जी निविदा काढली होती त्याच्या मध्ये एका मशिनचा दर रू.३० लाख ६२ हजार असा आहे.तीन ठिकाणी मशिन बसविणे प्रस्तावित केले आहे.एक मशिन साधारणत:दोन मे.टन कपॅसीटीची आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ई - निविदा क्र.१६६३ मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ओला कचरा प्रति दिन प्रक्रिया करणेकामी २ मे.टन क्षमतेचे तीन ठिकाणी कंपोस्टींग मशीन बसविणे व तीन वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास व येणा-या खर्चास रूपये ३०,६२,०००/- व वार्षिक मेन्टेनन्स बाबत रक्कम रूपये ११,७०,०००/- व खताच्या विक्रीमध्ये ४५% रॉयल्टी देण्याचे मान्य केल्यानुसार वेस्टबीन्स सोल्युशन,नागपुर यांची निविदे बाबचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ई - निविदा क्र.१६६३ मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ओला कचरा प्रति दिन प्रक्रिया करणेकामी २ मे.टन क्षमतेचे तीन ठिकाणी कंपोस्टींग मशीन बसविणे व तीन वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास व येणा-या खर्चास रूपये ३०,६२,०००/- व वार्षिक मेन्टेनन्स बाबत रक्कम रूपये ११,७०,०००/- व खताच्या विक्रीमध्ये ४५% रॉयल्टी देण्याचे मान्य केल्यानुसार वेस्टबीन्स सोल्युशन,नागपुर यांची निविदे बाबचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २५ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित पाउलबुध्दे यांची उर्वरीत माहे- जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती रक्कम अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

संदर्भ :- १. मा.स्थायी समिती ठराव क्र.८० दि.२५/०१/२०१२ , मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१३६ दि.२५/१०/२०१३

२. श्री. विनित पाउलबुध्दे तत्कालीन विरोधी पक्ष नेते यांचे माहे जुन, जुलै , ऑगस्ट , सप्टेंबर २०१३ मधील प्रतिपूर्ती मिळणे बाबतचे मंजूर प्रस्ताव

३. श्री. विनीत पाउलबुध्दे तत्कालीन विरोधी पक्षनेते यांचे दि.१२/१२/२०१७ चे पत्र

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेचे तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनितनाथ पाउलबुध्दे यांनी संदर्भिय क्र.३ अन्वये दि.१२/१२/२०१७ रोजी इकडेस पत्र देवून अहमदनगर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते पदी दि.१४/११/२०१३ ते दि.३१/१२/२०१३ अखेर कार्यकाल उपभोगला असून सदर कालावधीत वाहन वापर प्रतिपूर्ती घेतलेली आहे. तथापी सदर कार्यकालातील जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ मधील वाहन वापर प्रतिपूर्ती मला अद्याप मिळालेली नाही.सदरची वाहन वापर प्रतिपूर्ती रक्कम मिळणे कामी पुढील कार्यवाही करणेबाबत संबंधीत विभागास आदेश होणेबाबत पत्रान्वये कळविले आहे.

संदर्भिय क्र.१ अन्वयेच्या ठरावाचे मंजूरीनुसार विरोधी पक्षनेते यांना वाहन वापर प्रतिपूर्ती अनुज्ञेय असून विरोधी पक्षनेते यांनी महानगरपालिका कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले बाबत प्रतिपूर्ती देणेबाबतचे प्रस्तावास देखील तत्कालीन उपायुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. प्रतिपूर्ती बाबतची बीले देखील तयार करण्यात आली होती. तथापी काही तांत्रिक कारणामुळे सदरचे प्रकरणास विलंब झालेला असून तत्कालीन विरोधी पक्ष नेते यांची जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ साठी प्रतिपूर्ती रक्कम देणे बाकी असलेबाबत उपलब्ध कागदपत्रानुसार दिसून येते.

तरी तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित नाथ पाउलबुध्दे यांचे संदर्भिय पत्र, ठराव तसेच मंजुर प्रस्तावानुसार माहे जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ मधील वाहन वापर प्रतिपूर्ती एकूण रक्कम रू. ८८०००/- अदा करणेस प्रस्ताव मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा रिपोर्ट असे.

यावर मेकॅ.इंजि. यांचा अभिप्राय की, मा.श्री. विनित पाऊलबुध्दे हे सन २०११ ते २०१३ मध्ये मनपात विरोधी पक्ष नेते म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांना वाहन वापर प्रतिपूर्वी योजना लागू होती. वाहन वापर प्रतिपूर्ती योजना लागू असतांना त्यांना माहे जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ या चार महिन्यांसाठीच्या वाहन वापर प्रतिपूर्ती देयक अदा करण्यात आलेले नाहीत. या कालावधीतील देयके अदा करणेबाबतचा प्रस्ताव मंजूर आहे तसेच बील फॉर्मवर देखील माझ्या सहया आहेत. परंतु तत्कालीन मो.व्हे. क्लार्क श्री. पुंड यांनी बील फॉर्म मंजूर करून घेतलेला नाही. श्री. विनित पाऊलबुध्दे यांचे माहे जून १३ते माहे सप्टेंबर १३ या कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती देणे क्रमप्राप्त असल्याने त्यांचे बील फॉर्म ऑडीट करून घेउन मंजूर करणे योग्य मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक सही

यावर मुख्य लेख परिक्षक यांचा यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम ४५ प्रमाणे विभागाने उचित कार्यवाही करून फेर सादर करावे. /अ

यावर मॅके.इंजि. यांचा अभिप्राय की, "अ" बाबत कृपया सविस्तर मार्गदर्शन व्हावे ही विनंती.

यावर मुख्य लेख परिक्षक यांचा यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम ४५ पाहुन विभाग प्रमुख यांनी कार्यवाही करावी.

यावर मुख्य लेख परिक्षक यांचा यांचा अभिप्राय की, महानगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम ४५ नुसार मुदती व्याह्य झालेल्या अशा नगरपालिकेच्या सर्व मागण्या मुदत व्याह्य बाबी बाबत मा.स्थायी समिती यांच्या मंजुरी खेरीज देता येणार नाही या विभागाने खात्री करून उचित निर्णय घ्यावा./अ

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे कार्यवाही करणे

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित पाउलबुध्दे यांची उर्वरीत माहे- जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती रक्कम अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.,

मा.सभापती साहेब :- तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित पाउलबुध्दे यांचे माहे- जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ या कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती एकूण रक्कम रू. ८८०००/- अदा करणेस हि सभा मान्यता देत आहे.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री. विनित पाउलबुध्दे यांचे माहे- जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ या कालावधीतील वाहन वापर प्रतिपूर्ती देणे क्रमप्राप्त असल्याने त्यांचे बील फॉर्म ऑडीट करून घेउन,वाहन वापर प्रतिपूर्ती एकूण रक्कम रू. ८८०००/- अदा करणेस हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३

विषय क्रमांक- २६ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत करणेस व त्याकामी पुढील निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही
२०१७//प्र.क्र.४५५/कार्या .१२ मंत्रालय मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८

उपरोक्त विषयान्वये की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही २०१७//प्र.क्र.४५५/कार्या .१२ मंत्रालय मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ अन्वयेच्या परिपत्रकामध्ये मा.सर्वाच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पध्दतीने निर्माण केलेल्या पदांवरील नेमणूकीच्या अटी-शर्ती तसेच सदर पदावर नियुक्त कर्मचा-यांच्या सेवानियमित न करणे बाबत सुचना दिलेल्या असुन सदर परिपत्रकामध्ये सोबत विवरण पत्र-अ-मध्ये- सदर पदांची नेमणूक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

तसेच या पदावरील अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

तसेच सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही यांची काळजी नियुक्ती प्राधिकारी यांनी घ्यावी. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुनश्च नियुक्त करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत असल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रकियेस सामोरे जावे लागेल. असे निर्देशित केलेले आहे.

त्याचप्रमाणे सदर परिपत्रकामध्ये सोबत विवरण पत्र-ब कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांसोबत करावयाच्या करारनाम्यामध्ये अंतर्भुत करावयाच्या अटी व शर्ती बाबत निर्देशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिराती प्रसिध्दीस देवुन मा.निवड समितीमार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती होवुन उमेदवारांची निवड करण्यात येवुन निवड झालेलया उमेवारांची प्रथमतः सहा महिन्याकरिता ठराविक मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेमधील कै. बाळासाहेब देशपांडे दवाखानयामध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, रक्तपेढी विभागामध् रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन , स्टाफ नर्स , बांधकाम विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (सिव्हील), पाणी पुरवठा विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) व (सिव्हील) , विजतंत्री , पंपचालक, इलेक्ट्रीक विभागामध्ये वायरमन, तसेच मोटार व्हेईकल विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल)म्हणुन दर्शविलेल्या सर्व तात्पुरत्या स्वरूपात पदांवर सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर नियुक्ती केलेली असून त्यांची मुदत समाप्त झाल्यानंतर वेळोवेळी संबधित विभागाकडून संबंधितांची पुढिल कालावधीसाठी पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९ मधील कलम ५३ नुसार संबंधीताना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील पुर्ननियुक्ती बाबतचे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविण्यात येतात.

सदर प्रस्तावावर मा. स्थायी समितीच्या पुर्व मान्यता पारित ठराचाच्या अनुषंगाने संबंधिताना पुढील कालावधीकरीता पुर्ननियुक्ती बाबतची कार्यवाही प्रक्रिया करण्यात येते.

अहमदनगर महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर कराररबध्द पध्दतीने संबंधितांची पुर्ननियुक्त्या करण्यात आलेल्या असुन संबंधीतांच्या नावाचा तक्ता या प्रस्तावासोबत सादर करण्यात येत असून सदर तक्त्यामध्यील बहुतांशी मानधनावरील हे सन २०१० पासुन कार्यरत आहेत.

संदर्भिय शासन परिपत्रक दि.९/२/२०१८ मधील निर्देश पाहता सोबत जोडलेल्या तक्त्यांधील संबंधिताचा मानधनावरील सेवेचा कालावधी हा ३ वर्षापेक्षा जास्त झालेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.अमपा -२०१२/प्र.क्र.३०१ (भाग-२)/ नवि- २५ मंत्रालय, मुंबई ३२ दि.६ फेबुवारी २०१६ अन्वये मान्यता दिलेल्या असुन सदर मान्यता अटीमधील अट क्र.२ मध्ये महानगरपालिकेच्या ज्या सेवा आउट- सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे अशा सेवा आउट-सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात असे निर्देशित केलेले आहे. त्यानुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभगामध्ये अत्यावश्यक सेवेचा विचार करता बाहययंत्रणेद्वारे (आउट-सोर्सिंग) नुसार मन्युष्यबळ ठेका पध्दतीने उपलब्ध होणेसाठी अभिकर्ता यांचेमार्फत सेवा उपलब्ध होणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्दीस देवुन निविदा मागविण्यांत आलेली असुन त्यानुषंगाने सुमित फॅसिलीटीस प्राव्हेट लिमिटेड, चिंचवड पुणे यांची ई - निविदा क्र.१५४२ यापुर्वीचा दाखल झालेल्या असुन सदर निविदेमधील दरपत्रक अवाजवी असल्याने सदरचे दर कमी होणेच दृष्टिने दर निश्चिती बाबत वाटाघाटी होणेबाबत प्रस्ताव प्रस्तावीत करण्यात आलेला असुन सद्यस्थितीतमध्ये त्याबाबत निर्णय प्रलंबित असुन सदर प्रस्तावावर अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही. सदर अंतिम मान्यता प्राप्त होण्याचे प्रकियेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

संदर्भिय शासन परिपत्रक दि. ९ फेबुवारी २०१८ मधील नमुद केलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवपही करणे झाल्यास अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्यामधील संबंधीतांना तांत्रिक पदावर कराररबध्द पध्दतीने मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी हा ३ वर्षापेक्षा जादा होत असल्याने त्यांची यापुढे पुढील कालावधी करीता पुर्ननियुक्ती देणेबाबत कार्यवाही न करता पुनश्च : विविध विभागामध्ये तांत्रिक पदांवर कराररबध्द पध्दतीने नियुक्तीबाबत पुनश्चः वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवुन मा. निवड समितीमार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती होवुन निवड होणा-या उमेदवारांची एकत्रित ठोक मानधनावर ११ महिन्यांकरिता नव्याने नियुक्त्यांबाबत कार्यवाही प्रस्तावीत करावी लागेल व त्याचप्रमाणे तत्पुर्वी उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रक मा. स्थायी समिती कार्यालय यांना अवगत होणेकरीता पाठविणे योग्य होईल . तथापी प्रस्तुत प्रकरणी निर्णयाकरीता आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्तयांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्य.

## करारानुसार मानधनावरील कर्मचा-यांची माहिती

| अ क्र | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | दरमहा मानधन | कार्यरत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.रेणुका प्रणव जोशी | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे.दवा. | २०,०००/- | २३/१२/२०१४ |
| २ | अमोलिक रेखा रमेश | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ८,०००/- | ०८/०७/२०१३ |
| ३ | शिंदे शितल गंगाराम | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ८,०००/ | २३/१२/२०१४ |
| ४ | तृप्ती रावसाहेब बडे | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ८,०००/ | २३/१२/२०१४ |
| ५ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ८,०००/ | २६/१०/२०१५ |
| ६ | स्वप्नाली प्रताप इंगावले | पचारिका | कै.बा.दे.दवा. | ८,०००/- | २६/१०/२०१५ |
| ७ | अर्पणा विलास चाबुकस्वार | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ६,०००/- | २६/१०/२०१५ |
| ८ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारिका | कै.बा.दे.दवा. | ६,०००/- | २६/१०/२०१५ |
| ९ | डॉ. मुकुंद चंद्रकांत तांदळे | रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी | रक्तपेढी | ३५,०००/- | १२/०७/२०१६ |
| १० | मोरे पल्लावी दगडू | लॅब टेक्नी. | रक्तपेढी | १६,०००/- | २७/०४/२०१० |
| ११ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्नी. | रक्तपेढी | १६,०००/- | ०१/१०/२०१२ |
| १२ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | रक्तपेढी | ११,०००/- | ०१/१०/२०१२ |
| १३ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | रक्तपेढी | ११,०००/- | ०१/१०/२०१२ |
| १४ | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | रक्तपेढी | २०,०००/- | ०१/१०/२०१२ |
| १५ | नंदकिशोर विठ्ठल जाधव | क. अभियंता (सिव्हील) | बांधकाम | २०,०००/- | २८/११/२०१४ |
| १६ | पडोळे राहुल शंकर | क. अभियंता (सिव्हील) | बांधकाम | २०,०००/- | ०६/१०/२०१५ |
| १७ | राहुल सदाशिव गिते | क. अभियंता (मॅकेनिकल) | पाणी पुरवठा | २५,०००/- | ०९/१०/२०१२ |
| १८ | प्रदिप सदाशिव ढगे | क. अभियंता (मॅकेनिकल) | पाणी पुरवठा | २५,०००/- | ०९/१०/२०१२ |
| १९ | स्नेहल राजेंद मुळे | क. अभियंता (सिव्हील) | पाणी पुरवठा | २०,०००/- | २३/०४/२०१२ |
| २० | विशाल गोरख शिंदे | क. अभियंता (सिव्हील) | पाणी पुरवठा | २०,०००/- | ०६/१०/२०१५ |
| २१ | पुंड संदिप प्रभाकर | विजतंत्री | पाणी पुरवठा | ९,०००/- | २६/०४/२०११ |
| २२ | सोनवणे मनिष कैलास | विजतंत्री | पाणी पुरवठा | ९,०००/- | ०८/०६/२०१२ |
| २३ | सागर दिलीप जाधव | पंपचालक | पाणी पुरवठा | ९,०००/- | २७/०७/२०१६ |
| २४ | गणेश बाबाजी शिंदे | पंपचालक | पाणी पुरवठा | ९,०००/- | २७/०७/२०१६ |
| २५ | राजेश पुंडलिक टाकळकर | पंपचालक | पाणी पुरवठा | ९,०००/- | २७/७/२०१६ |
| २६ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | पाणी पुरवठा | ९,०००/- | २७/०७/२०१६ |
| २७ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/- | ११/१२/२०१२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | ११/१२/२०१२ |
| २९ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | ११/१२/२०१२ |
| ३० | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | ११/१२/२०१२ |
| ३१ | देवरे गितेश आणासाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | ११/१२/२०१२ |
| ३२ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | ११/१२/२०१२ |
| ३३ | डहाळे सौरभ भाउसाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | २१/०२/२०१३ |
| ३४ | अंकित किशोर कासवा | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | १९/१०/२०१५ |
| ३५ | शेख अजिज सत्तार | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | १९/१०/२०१५ |
| ३६ | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | १९/१०/२०१५ |
| ३७ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | १९/१०/२०१५ |
| ३८ | गायकवाड अरविंद शामराव | वायरमन | इलेक्ट्रीक | ९,५००/ | २७/०१/२०१६ |
| ३९ | पवार स्वप्निल बाळकृष्ण | कनिष्ठ अभियंता (ॲटो. मोबाईल) | मोटर व्हेईकल | २०,०००/- | ०६/१२/२०१० |
| ४० | जयेश वसंत कोके | कनिष्ठ अभियंता (ॲटो. मोबाईल) | मोटर व्हेईकल | २०,०००/- | १३/०८/२०१४ |

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

***

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत करणेस व त्याकामी पुढील निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- परिपत्रक सर्व सदस्यांना दाखवून त्या बाबत माहीती देण्यात यावी.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत झाले आहे.

मा.सौ.उषा नलवडे :- महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ अवगत झाले.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार

मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत झाले आहे.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक ; एस आर व्ही २०१७/प्र.क्रं.४५५/कार्या १२,मंत्रालय,मुंबई दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर करारानुसार मानधनावरील दिर्घकाळ झालेल्या पुर्ननियुक्त्यांबाबत उपरोक्त शासन परिपत्रक मा.सभापती, स्थायी समिती व मा.सदस्य यांना अवगत झाले आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक- २७ सोमवार दि.१६/०७/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मा.श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे, तत्कालीन आयुक्त यांचा बदली प्रवास भत्ता बील एकुण रक्कम रूपये ७०,५८०/- अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मा. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन आदेश क्र.अ.शा.प.क्र.एईओ १११६/५/२०१६ दहा मंत्रालय मुंबई ३२ दिनांक ६/५/२०१६ अन्वये श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे यांची अहमदनगर महानगरपालिकेकडे "आयुक्त" या पदावर बदली करण्यत आली आहे. त्यानुसार ते दिनांक ९/५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर अहमदनगर महानगरपालिकेकडे रूजू झालेले आहे. श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे यांनी सामन वाहातुकीची पावती अर्जाद्वारे दिनांक ८/८/२०१७ रोजी इकडेस सादर केलेली आहे.

तरी श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे , आयुक्त यांनी सादर केलेले रू.९१,२९४/- चे बदली प्रवास बिलाचे लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी होवुन सदरची रक्कम रूपये ९१,२९४/- संबंधीताना लेखा विभागाकडून अदा करणे उचित होईल.

तथापी रिपोर्ट मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे प्र. सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मुख्यलेखा अधिकारी यांचा सहमती दर्शकस सही

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, १. महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक राहिल. ,२. वित्त विभागाचे शासन निर्णय दि. ३ मार्च २०१० मधील अ.क्र.११ (ड) (२) मधील नियमाप्रमाणे रस्त्याने वहातुक केलेल्या सामानाची परिगणना वरील तरतुदीप्रमाणे करण्यात आलेली नाही त्यामुळे रक्कम रू.२२,८९०/- अनुज्ञेय ठरत नाही परिगणना करून अनु.क्र. १ व २ उत्तरासह फेरसादर करावे.

फेरसादर,

संदर्भ :- लेखा परिक्षण विभाग यांचेकडील दि.२५/१/२०१८ रोजीचे अक्षेप

प्रस्ताव की, संदर्भिय अक्षेपा अन्वये रेल्वे संकेतस्थाळावरून माहिती घेतली असता गोंदिया ते अहमदनगर हे अंतर अंदाजे ४५० ते ५०० किलोमीटर असुन (लॅगेज रेटस) रेल्वे सामान वहातुक दरपत्रकानुसार ४९१ ते ५०० किलोमीटर करीता ९१-१०० किलोसाठी १७४.६३ दाखविण्यात आलेले आहे. तसेच श्री.गावडे आयुक्त यांनी सादर केलेल्या श्री. ओम ट्रान्सपोर्ट गुरूनानक मार्केट फुलचूर नाका, नागापूर रोड गोंदिया यांचेकडील बिलावर घरगुती सामान भाडा ४५०००/- इतके दर्शविण्यात आलेले असुन किती किलो सामानाची वहातुक केली याबाबत उल्लेख नसल्याने अंदाजे एक क्विंटल (१०० किलो) गुर्हित धरून १७४६.६३ अधिक वित्त विभागाचे शासन निर्णय दि.३ मार्च २०१० मधील अ.क्र. ११ (ड) (२) नुसार २५% वाढीव रक्कम रू.४३६.५७ एकुण २१८२/- चे मुळ देयकात दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

तसेच संदर्भिय अक्षेप क्र.१ अन्वये महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे , आयुक्त यांचे बदली प्रवास भत्ता बिल रक्कम रूपये ७०,५८०/- अक्षरी सत्तर हजार पाचशे ऐंशी मात्रचे बदली प्रवास बिलाचे लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी होवुन सदरची रक्कम संबंधीताना अदा करणे कामी महाराष्ट्र लेखा सांहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) नुसार मा. स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांची मंजुरी घेवुन श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे , तत्कालीन आयुक्त यांना लेखा विभागाकडून अदा करणे उचित होईल. तथापी आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे सहाय्यकआयुक्त यांचा फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.प. अभिप्रायासह सादर करावे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,वरील मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्रायामधील मुद्दा क्र. १ कायम आहे., मुद्दा क्र.२ ची आस्थापना विभागाने पूर्तता केली आहे सदर प्रकरणी मा.आयुक्त यांनी उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा. मु.ले.प. यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मान्य

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

***

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मा.श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे, तत्कालीन आयुक्त यांचा बदली प्रवास भत्ता बील एकुण रक्कम रूपये ७०,५८०/- अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.,

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मा.श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे, तत्कालीन आयुक्त यांचा बदली प्रवास भत्ता बील एकुण रक्कम रूपये ७०,५८०/- अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ व ४५) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मा.श्री. दिलीप बाळकृष्ण गावडे, तत्कालीन आयुक्त यांचा बदली प्रवास भत्ता बील एकुण रक्कम रूपये ७०,५८०/- अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका